[ काव्येतिहास-संग्रह. ]

१०

# श्रीमंत पंत प्रधान यांची शकावली.

ही

अर्थनिर्णायक व अवांतर माहितीच्या विपुल टीपांसह

**काशिनाथ नारायण साने, बी. ए. ( डेक्कन कॉलेज )**

यांनीं

**प्रकाशित केली.**

श्रीरामासि भजावें भक्तें ग्यां जेंवि तेंवि संतांतें ।
राजासि उपासावें तैसेंचि जनें **प्रधान पंतांतें** ॥

**मोरोपंत.**

शके १८०५.

श्री.

महाराष्ट्राच्या भाषेचा व इतिहासाचा आस्थापूर्वक

अभ्यास करूं इच्छिणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

परमप्रेमपूर्वक अर्पण करितों.

ग्रंथ-प्रकाशक.

# पंत प्रधान पेशवे यांच्या साल-
# वार कारकीर्द.*

कारकीर्द बाळाजी विश्वनाथ पंत प्रधान यांस वस्त्रे [झालीं] शके १६३५ जयनाम संवत्सरे सुरुसन आर्बा अशर मयाः तैन व अल्लफ. सनें ११२३ माघ मास. शाहू महाराज छत्रपति दिल्लीहून सुटून येऊन किल्ले सातारा येथें येऊन अष्टप्रधान पदें देऊन आरंभ केला. ते समयीं श्रीमंत बाळाजी विश्वनाथ यांस पंतप्रधान [नेमून] यांचे दिवाण आबाजी पंत पुरंदरे मुजुमदार व चिटणीस हुजूरचे नेमिले. हुजूरची मुतालिकी पुरंदरे यांस देऊन वस्त्रें सर्वांस दिलीं. बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान शिक्का झाला. पुणें देशींचा सुभा दिला. तेव्हां पुण्यांत अम्मल शके १६२९ एकूणतिसांत निजाम मुलुखें यांचा. ते औरंगजेब पातशहा शांत झाल्यावर दिल्लीहून बहादरशहा पातशहा पासून सहा सुभे दक्षिणेची सुभेदारी करून आले. त्यांणीं पुणें वगैरे जहागीर रंभाजी निंबाळकर यांस दिली होती. त्यांजकडून कसबे मजकुरीं बाजीकदम फौजदार व गुंडाजी नाईक शेकदार‡ अमलावर होते. तों शके मजकुरीं पंत प्रधानांकडील त्र्यंकोजी ढमढेरे पुण्यास चौथाई अमलावर आले. दोन अंमल चालूं

---

* देलवडी, ता० भिमथडी जि० पुणें येथील इनामदार विठ्ठलपंत पुणेकर यांच्या घरीं पेशव्यांच्या सालवार हकीगती २ सांपडल्या, त्या रा० शंकर तुकाराम शालिग्राम यांणीं आम्हांकडे दिल्या. त्यापैकीं एक अवल पासून सवाई माधवराव यांच्या अखेरी पर्यंत आहे. ही जुन्नरी कागदाच्या चिकट बंदावर लिहिलेली आहे. हिचें वरचें पान नाहींसें झालें आहे. राहिलेल्या तुकड्यावरून त्यावर पेशव्यांची वंशावळ होती असें दिसतें. हींत दिलेली हकीगत पुष्कळ पाल्हाळ नसतां चांगली तपशीलवार लिहिलेली आहे. दुसरीमध्यें नुसतें मुसलमानी साल देऊन एखादी दुसरी झालेली मुख्य गोष्ट इतकेंच कायती दिली आहे, पण ही अव्वली पासून पेशव्यांचे अखेरी पर्यंत आहे. यांतील पहिली येथें छापण्यास आरंभ करितों. दुसरींत जेथें फरक दृष्टीस पडेल तितका मात्र देत जाऊं म्हणजे पुरे.

† अर्बा अशर मया व अल्लफ=१११४ मूळांत 'मयातैन' असें आहे तें चूकीचें आहे. ही चूक पुढील कलमांतही दृष्टीस पडते.

१ सन ११२३ हा सन फसली असें येथें व पुढें ही समजावें.

२. निजाम उल्मुल्क असफजहा हे दक्षिणेच्या सुभ्यावर प्रथम १७१३ सालीं आले. पुनः परत दिल्लीस गेल्यावर त्यांस तोच सुभा १७२२ च्या सुमारास झाला. मध्यंतरीं सुभा सय्यद हुसेन यांजकडे होता.

‡ शेखदार=थोडे गांवांवर अधिकार ज्याचा असा कामगार; तरफदार असेंही यास म्हणतात.

लागले. श्रीमंत सातारियाहून वस्त्रें घेऊन सासवडास † येऊन राहिले. अखेर साल झालें. मुलूख वैराण. पुण्यांत वस्ती जुजबी होती. पातशहाचा अंमल उठला. सदरहु अंमल झाला असे.

१. शके १६३६ विजयनाम संवत्सरे सु॥ खम्मस अशर मय्यातैन § व अल्लफ. सन ११२४—स्वारी पुणें देशीं फिरली. मुलुख वैराण. बरावर आबाजीपंत ‡ पुरंदरे———कलम १.

१. शके १६३७ मन्मथनाम संवत्सरे सन ११२५ स्वारी करून पुरंदर येथें अंमल केला. पुरंदरे यांणीं अंमल बसवून सासवडीं राहिले. कलम—१.

१. शके १६३८ दुर्मुखनाम संवत्सरे सन ११२६—स्वारीस निघोन कुटुंब बराबर असतां मुळानदीवर गेले. तेथें मौजे हिंगणगांव ता॥ सांडस येथें दमाजी थोरात पुंड होता. त्याणें भेटीस म्हणून बलावून घेऊन कुटुंबासह कारभारी आबाजीपंत पुरंदरे यांस अटक करून बाळाजीपंतांवर निकर्ष करूं लागले. तेव्हां आबाजीपंतानें निकर्ष सोसून खंडाचें बोलणें केलें. द्रव्य द्यावयास नाहीं, सबब सौभाग्यवती मातोश्री राधाबाई व पुत्र बाजीराव व चिमाजी आपा तेथें ठेवून खासे निघाले. तेथें मोरशेट करंज्या होता तो लाह्यांचे लाडू करून देत होता. सबब त्याचें व त्याचे पुत्र घनशेट करंज्ये यांचें सरकारांतून चालविलें. कान्होजी आंग्या दिवट्या महाराजांपाशीं होता त्यास कोंकणचे किल्ले सांगितले—कलम—१

१. शके १६३९ हेमलंबीनाम संवत्सरे सन ११२७——— निजामनमुलुकास दिल्लीहून हुकूम आला यामुळें तो दिल्लीस जावयास निघाला. त्यास श्रीमंत व आबाजीपंत पुरंदरे भेटून भाईचार केला. त्यानें फौजेचे शिरस्ते प्र-

---

† सासवडास पेशव्यांचा जुना वाडा ३ चौकांचा होता. थोडे दिवसांपूर्वी मागील दोन चौक पाडिले. पुढील चौकांत सरकारी मराठी शाळा आहे. नवा वाडा नदीच्या पलीकडे गांवाबाहेर आहे तो पुढें बांधिला. या नव्या वाड्यांत हल्लीं फेरफार करून मामलेदार कचेरी घातली आहे.

§ खम्मस वगैरे—११५. पृ. १ टी.† पहा.

‡ "आबाजीपंत" असें आतां जिकडे तिकडे दृष्टीस पडतें. यांचें नांव 'अंबाजीपंत' असें आहे. मूळ कागद आज आम्हांपाशीं नाहींत याजमुळें त्यांत काय आहे तें पहातां येत नाहीं. पुढेंही 'आबाजीपंत' असेंच येत जाईल. आम्ही मूळ कागदाची प्रत करून घेतल्यास ५ वर्षांवर दिवस होऊन गेले.

३. निकर्ष=हाल, यातना. कैद करून राखेचे तोबरे देणें, चाप लावणें वगैरे प्रकार.

४. अंबाजीपंत व मोरशेट करंज्ये याची वर्तणूक ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. हल्लीं करंज्ये हे कोठे आहेत ?

५. कोणत्या ? शिवाजीपाशीं असावा.

६. दक्षिणेचा सुभेदार या वेळीं सय्यद हुसेनखान हा होता. त्यासच येथें निजाम उल्मुल्क म्हटलें आहे—मागें टीप २ पहा.

माणें रोजमुरा करार करून बारा हजार फौजेनिशीं बराबर दिल्लीस नेलें. तेव्हां रामाजीपंत व बाळाजीपंत नाना भानु[7] बराबर होते.

१. शके १६४० विलंबीनाम संवत्सरे सन ११२८. निजाममुलकानें बाळाजीपंताचा व आबाजीपंताचा बडिवार पातशहापाशीं करून मेजवानी व द्रव्य देववून आपल्या बराबर देशीं घेऊन आले. खंडाचा पैका दमाजी थोरात याचा देऊन मातोश्री[9] राधाबाई व पुत्र बाजीराव, चिमाजीआप्पा सोडवून घेतलें[10]. आणि नबाबाची व आपली फौज मिळवून हिंगणगांवास वेढा घालून दमाजी थोरात धरून पुरंदरावर कैदेंत ठेविला. हिंगणगांवची गढी पाडून, चिरे मुळानदींत टाकून, गाढवांचा[11] नांगर फिरविला. मुलकास लावणीचा कौल देऊन राजदर्शनास साताऱ्यास गेले. मोंगलांकडील अम्मल पुण्यांतील उठविला. या सालीं पुणें येथें वस्ती आहे. हरी यादव[12] सुभेदारीवर आहेत. दिल्लीचे स्वारींत बाळाजीपंत भानु[13] फडणीस शांत झाले, फडणिशीवर अंतोजीपंत असत—कलम.

१. शके १६४१ विकारीनाम संवत्सरे सन ११२९. श्रीमंत व आबाजीपंत पुरंदरे साताऱ्यास असतां महालांतून राण्यांकडून आग्रह दमाजी थोरात सोडावयाचा झाला. त्यामुळें राजश्रींचे आज्ञेवर दमाजी थोरात सोडिला. निरोप घेऊन पुणें प्रांतीं आले. पुण्यांतील मोंगलाचा ठाणेदार उठून गेला. एक अम्मल प्रधान यांचा झाला. आश्वीन मासीं बाळाजीपंत नानांचा काळ झाला. पुत्र बाजीराव व चिमाजी आप्पा व स्त्री राधाबाई होती. कारभारी आबाजी पंत पुरंदरे यांनीं सार्थक केलें. शिक्का इस्तकबिल कार्तीक तागाईत फाल्गुन श्रीमंतांचा काळ झाल्यावर शिक्का त्याच नांवाचा चालवीत होते.—कलम

## कारकीर्द श्रीमंत बाजीराव बल्लाळ प्रधान.

१. शके १६४२ शार्वरीनाम संवत्सरे सन ११३०. छ २० जमादिलाखर महाराज शाहू राजे [यांणीं] साताऱ्यास बाजीराव साहेब यांस वस्त्रें दिलीं व दिवाणगिरीचीं व हुजूरचे मुतालकीचीं वस्त्रें आबाजीपंत पुरंदरे यांस दिलीं. बाजीराव बल्लाळ प्रधान शिक्का झाला. राजश्रींचा निरोप घेऊन पुणें देशीं आले. रयतेस कौल सन ११२८ त दिले होते त्याप्रमाणें चालविले. ते सालीं श्रीमंतांस पुत्र नानासाहेब झाले———कलम.

---

७. भानु—हे नाना फडणवीस यांचे पूर्वज—यांजकडे फडणिशी होती—पेशव्यांची बखर पृ० ११।१२।१३ पहा.

८. वर टीप ६ पहा.

९. 'मातु:श्री' असें बखर लिहिणारानें सन्मानार्थ लिहिलें आहे. ही बाळाजीपंताची स्त्री.

१०. वर वर्ष १६३८ पहा.

११. गाढवाचा नांगर फिरविणें हें ओसाड करून टाकण्याचें चिन्ह आहे.

१२. हे हरी यादव कोण ?

१३. पेशव्यांची बखर पृ० १७।१८ पहा.

१. शके १६४३ प्लवनाम संवत्सरे सन ११३१. उदमी लोकांस पेठेचे कौल देऊन आमदानी करविली. कारभारास संभाजी जाधव[१४] ठेविले. स्वारीस निघाले. बरोबर आबाजीपंत पुरंदरे. लोकांस नालबंदी देऊन फौज तयार करून ब्रम्हपुरी[?] पर्यंत गेले. तेथें भडबुंज्या जती सरंजाम सुद्धां होता त्याशीं लढाई करून लुटून घेऊन देशीं सातान्यास जाऊन राजदर्शन घेऊन पुण्यास आले.[१५]——कलम.

१. शके १६४४ शुभकृतनाम संवत्सरे सन ११३२. श्रीमंत फौजेसुद्धां कारभारी आबाजी पुरंदरे बरोबर घेऊन स्वारीस निघाले. तों गाजुद्दीखान पठाण चालून आला. त्याचा पराभव करून सातान्यास राजदर्शन घेऊन पुण्यास आले--कलम १.

१. शके १६४५ शोभननाम संवत्सरे सन ११३३. स्वारी हिंदुस्थानाकडे चालली. तों सय्यदखान मोठी फौज घेऊन चालून आला. त्याशीं लढाई देऊन, लुटून, देशीं येऊन राजश्रींस भेटले. या संवत्सरीं रघुनाथराव पुत्र झाले. कोंकणांत बावडे-करांपासून कान्होजी आंग्रे याणीं सुवर्णदुर्ग घेतला. ——कलम.

१. शके १६४६ क्रोधीनाम संवत्सरे सन ११३४. स्वारी निघाली तों दाउदखान चालून आला. त्याशीं लढाई देऊन, पराभव करून, राजदर्शन घेऊन छ १ जिल्काद ऊर्फ श्रावणमासीं पुण्यांत आले. कारभारी आबाजी[१६] पुरंदरे. ——कलम.

१. शके १६४७ विश्वावसुनाम संवत्सरे सन ११३५. स्वारी फौजेस नालबंदी देऊन निघाली. कारभारी आबाजी पुरंदरे, फडणीस अंताजीपंत, व आया मुजुमदार, व आवजी परभु चिटणीस, व बापूजीपंत पोतनीस वगैरे मुत्सद्दी बरोबर घेऊन दिल्लीस[१७] गेले.——कलम.

१. शके १६४८ पराभवनाम संवत्सरे सन ११३६. स्वारी दिल्लीहून माघारी येऊन राजश्रींची भेट घेऊन पुण्यास माघारी आली.—— कलम.

१. शके १६४९ सन ११३७ स्वारी सातान्यास गेली. जनार्दन बाबा पुत्र झाले. देशीं स्वारी करून आले. कोंकणांत, संभाजी आंग्रे सुवर्णदुर्गास; कुलाब्यास मानाजी आंग्रे.——कलम.

---

१४. संभाजी जाधव हे कोण ? जाधवाच्या वाडीचे ?

१५. दुसऱ्या बखरींत "सन इसन्ने अशरीन स्वारी ब्ऱ्हाणपूर भडबुंज्याचें पारपत्य" असें आहे.

१६. "स्वारी मोंगलावर दाउदखान याचें पारिपत्य" दुसरी बखर.

१७. 'दिल्लीस' म्हणजे खानदेश माळवा इकडे इतकेंच येथें समजलें पाहिजे.

१. शके १६५० सन ११३८. स्वारी निघाली तों दमाजी थोरात याणें बंड केलें. त्याजवर चालून जाऊन लुटून घेऊन, धरून पुरंदर किल्यावर कैदेंत ठेविला. तो तेथें मृत्यु पावला. स्वारी देशीं हिंडून राजदर्शन घेऊन पुण्यास आली.———कलम.

१. शके १६५१ सन ११३९. नाना साहेब यांचें लग्न भिकाजी नाईक रास्ते यांची कन्या सौभाग्यवती गोपिकाबाई वधू निश्चय करून माघमासीं केलें. कसबे पुणें येथें पश्चिमेस भेंड्यांचे आवाराचें कुसूं होतें. त्याचे आंत कोटी राहत होते. त्यांस जागा मंगळवार पेठेंत देऊन, ती जागा मोजून, पांच बिघे घेऊन वाडा बांधावयास काम लाविलें. स्वारी देशीं करून पुण्यास आले. कलम.

१. शके १६५२ सन ११४० छ ७ जिलकाद स्वारी उंबरजेची करून राजदर्शन घेऊन छ १८ जिलकादीं पुण्यास आली. कारभारी आबाजी पुरंदरे. ———कलम.

१. छ ८ रा॥ आश्वीनमासीं डेरे संगमावर देऊन स्वारीस निघाले. फौजेस नालबंदी देऊन पागा व सरदार आवजी कवडे, कारभारी आबाजीपंत पुरंदरे, रघुनाथजी परभु व आया मुजुमदार व फडणीस वगैरे मुत्सद्दी सरंजाम ३०।३५ हजार फौजेनिशीं गुजराथ प्रांतीं गेले. तेथें त्रिंबकराव दाभाडे सेनापति चालून आले. आवजी कवडे यांस लुटलें. तेव्हां सर्वत्र बसून, विचार करून, चालून गेले. दाभाडे यांजजवळ पन्नास हजार फौज. हत्तीस अंदुक[१८] जोडून, लढाईस उभे राहून, तिरंदाजी खासे करितां करितां अकल्पित गोळी लागून ठार झाला. फौज मोडली. श्रावणमासीं गुजराथचा कारभार[१९] झाला. दाभाडे श्रावणमासीं ब्राम्हणांस देकार देत होते त्या देकाराची चाल पुण्यांत घातली. खबुत्रखान्यांत देकार चालता झाला.———कलम.

१. शके १६५३ सन ११४१. स्वारी गुजराथ करून देशीं आली. छ ३ जिल्हेजीं राजदर्शनास जाऊन छ १९ जमादिलाखरीं, मार्गशीर्ष मासीं पुण्यास आली. छ १० साबान माघमासीं कोंकणांत स्वारीस निघाले. कल्याणास जाऊन, कुलाब्यावरून पुण्यास आले. छ ९ रमजान, फाल्गुनमास. कारभारी आबाजी पुरंदरे. वाड्याचें काम चाललेंच आहे.———कलम.

१. शके १६५४ सन ११४२. स्वारी निघून निजाममुलूख याची भेट घेऊन जयपूर प्रांतीं गेले. राणोजी शिंदे यांस पागा दिली. मल्हारजी होळकर चाकरीस ठेऊन मुलकांत खंडणी घेऊन, देशीं येऊन राजदर्शनास छ १६ ज-

---

१८. अंदुक जोडून=ठाम करून.
१९. गुजराथचा कारभार झाला=गुजराथेचा सुभा पेशव्यास दिला?

मादिलाखरीं गेले. छ १७ रमजानीं पुण्यास दाखल झाले. घरीं बाळाजी बाजीराव होते. त्यांणीं रघुनाथराव यांचा व्रतबंध केला.——कलम.

१. शके १६५५ सन ११४३. वाड्याचें काम चालत आहे. श्रीमंत चिमणाजी आप्पा यांस राजेश्रींकडे छ ११ जमादिलावल आश्वीनमाशीं रवाना करून, बराबर पिलाजी जाधव यांस देऊन मुलुकगिरीस रवाना केलें. आप्पा यांस पुत्र सदाशिवपंत भाऊ झाले.—— कलम.

१. शके १६५६ सन ११४४. स्वारी छ १६ रबिलावलीं निघोन सातार्‍यास गेली. तेथून आबाजीपंत पुरंदरे यांनीं मुतालकीवर हुजूर दादोपंत यांस ठेविलें. आपण निघोन काशीस गेले. पिलाजी जाधव यांस बालेघांटीं छ १ रज्जबीं रवाना केलें. त्यांनीं स्वारी वर्‍हाडापर्यंत करून छ २४ मोहोरमीं आले. श्रीमंत चिमाजी आप्पा छ १६ साबानीं पुण्यास दाखल झाले. वाड्याचें काम तयार व्हावयास आलें.—— कलम.

१. शके १६५७, सन ११४५. श्रीमंत व चिमाजी आप्पा स्वारीस अजमीरपर्यंत गेले. तेथें आबाजीपंत पुरंदरे काशीहून येऊन भेटले. स्वारी करून देशीं आले. तों आबाजीपंतांचा काळ झाला. त्यास पुत्र महादाजी आबाजी होते. कारभार चिमाजी आप्पा करूं लागले. छ ६ जमादिलाखर कार्तीक माशीं कुलाब्याकडे स्वारी कोंकणांत करून छ २० मोहोरमीं राजदर्शन करून पुण्यास आले. वाड्याचें काम तयार झालें.—— कलम.

१. शके १६५८ सन ११४६ वाड्याची वास्तु करून वाड्यांत नांदूं लागले. मस्तानी कळावंतीण खासगीस होती. तीस जागा वाड्यांत करून ठेविली. स्वारीस भा ड ब दा व र [?] दतिया, वोडसें, यमुनास्थान, हिंदुस्थान प्रांतीं करून छ २४ सफरी पुण्यास आले. नंतर साष्टीस जाऊन, अम्मल बसवून, छ १३ रबिलावलीं आषाढ मासीं पुण्यास आले.—— कलम.

१. शके १६५९, सन ११४७. स्वारी हिंदुस्थान. निजामनअली नबाब यमुना पार होऊन बुंदेल खंडांत आले. बुंदेले व दतिया, वोडसें, ग्वालेर, चंदेरी, सो द र क र [?] व रोहिले, व सवाई जयसिंग यांचे पुत्र सामील[20] झाले. नबाब माळव्यांत येऊन पोहोंचले. सरकार फौजेचा मोकाबला[21] होतांच नबाब भुपाळाजवळ किल्याचे आश्रयानें जाऊन लढाई करूं लागले. छ ३ रमजानापासून छ २६ पर्यंत तोफांचे बळें फौज राखून राहिले. सरकार फौजेनें रसत[22] मना केली. सारें अन्न झालें तेव्हां स्नेहाचें बोलणें लावून दीड दीड कोशाचे

२०. सामील निजाम उल्मुल्क यास झाले.

२१. मुकाबला=गांठ, लढाई.

२२. रसत=दाणावैरण यांचा पुरवठा.

कूच क [ रून ] दुराईकडे[23] येऊन सल्ला करून माळवा दरोबस्त दिला. सनदा पातशहापासून करून देतों म्हणून करार केला. हिंदु राजे श्रीमंतांस येऊन भेटले. नवाब दिल्लीस गेले. चंमेली[24] आलीकडील मुलकाचा पैका घेत जावा असें कबूल केलें. श्रीमंत चिमाजी आप्पा देशीं फौज बाळगून होते. तों कोंकणांत वसई प्रांतीं इंग्रेजें[25] यांनीं अशेरीचा मोर्चा उठविला हें वर्तमान आलें. त्याजवरून हैरंजी[26] ताकपीर यांस लोक घेऊन जावयास सांगितलें. संभाजी शिंदे हजार स्वारांनिशीं रवाना करून खासा दरमजल कोंकणांत गेले. सातात्यास राजेश्री जवळ बाळाजी बाजीराव व महादाजी आबाजी पुरंदरे ठेविले होते. श्रीमंत देशीं हिंदुस्थानांतून येऊन राजदर्शन घेऊन अखेरीस पुण्यास आले. जंजेरियाची मसलत चालली.——कलम.

१. शके १६६० सन ११४८. जंजेऱ्याचे मसलतीस फौज राजेश्रींची[27] मदतीस आली. तह करून राजेश्रींस भेटून पुण्यास आले.——कलम.

१. शके १६६१ सन ११४९. स्वारी वसईची, चिमणाजी आप्पा कोंकणांत असतां वैशाख वद्य द्वितीया मंदवारीं दोन प्रहरा दिवसा वसईवर निशाण शाहू महाराज यांचें चढविलें. फत्ते झाली. पुण्यास आले. श्रीमंत विषयास लंपट झाले. याजमुळें चिमाजी आप्पाशीं अंतेर[28] पडून निघून नर्मदा तीरास गेले. महादजी आबाजी पुरंदरे बडोद्यास पाठविले होते ते व चिमाजी आप्पा व नाना साहेब राजेश्रीं जवळ गेले.——कलम.

१. शके १६६२ सन ११५०. बाजीराव बल्लाळ प्रधान यांचा काळ नर्मदातीरीं झाला. चिमाजी आप्पा वसईस. नानासाहेब सातोऱ्यांस. सुवर्णदुर्ग विजयदुर्ग येथें अम्मल तुळाजी आंग्रे. कुलाब्यास मानाजी आंग्रे.—कलम.

कारकीर्द श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब.

१. शके १६६२ सन ११५०. वैशाखमासीं बाजीराव शांत झाल्यावर त्यांचे पुत्र बाळाजी बाजीराव व रघुनाथराव व जनार्दन बाबा व चिमाजी आप्पा व त्यांचे पुत्र भाऊसाहेब होते.——कलम.

---

२३. दुराई सुराई–सिरोंजेच्या लगत आहे.

२४. जिला हल्लीं चंबला म्हणतात ती.

२५. 'इंग्रज' यांच्या बदल फिरंगी (पोर्तुगीज) असें पाहिजेसें वाटतें. अशेरी केळवे माहिमाजवळ आहे.

२६ हे कोण ?

२७. शाहूकडून प्रतिनिधी व फत्तेसिंग भोंसले आले त्यांस उद्देशून हें लिहिणें असावें.

२८. अंतर कसें पडलें तें स्पष्ट होत नाहीं. यावरून दोघाभावांत कलहाग्नि पेटावयास आरंभ जाला होता असा संशय चांगला येतो.

२९. आपा व नाना असे उभयतां या वेळीं कुलाब्याजवळ स्वारीस होते असे अन्यत्र दाखले सांपडतात.

१. शके मजकूर साताऱ्यास राजश्रींजवळ बाळाजी बाजीराव दोन अडीच वर्षें अगोदरच जाऊन [ येऊन ? ] होते. तों प्रधानपंत नर्मदातीरीं कैलासवासी झाले. तेव्हां रघूजी भोंसले यांणीं बाबूजी नाईक बारामतीकर यांस पेशवाई द्यावयाचें बोलणें लाविलें. तेव्हां महादाजी आबाजी पुरंदरे, गोविंदराव चिटणीस यांचे विद्यमानें बोलले. तेव्हां राजश्रींनीं बाळाजी बाजीराव यांस [ पेशवाईचीं ] वस्त्रें व पुरंदरे यांस हुजूरचे मुतालकीचीं व दिवाणगिरीचीं वस्त्र दिलीं. निरोप घेऊन पुण्यास आले. बाबूजी नाईक बारामतीकर यांचें देणें होतें. त्यांनीं ऐवजाकारितां तगादा बसविला. त्याचा निकाल पुरंदरे यांणीं केला. छ ९ रमजानीं, मार्गशीर्ष माशीं, श्रीमंत व कारभारी महादाजी आबाजी स्वारीस निघाले. बरोबर सौभाग्यवती गोपिकाबाई व भाऊसाहेब होते. छ ८ सवाल, पौषमाशीं चिमाजी आप्पांचा काळ झाला. स्वारी हिंदुस्थानांत. राजे भोंसले वगैरे खंडणी घेऊन यश संपादून पुण्यास दाखल झाले. त्या समयीं सदाशिव चिमणाजी भाऊसाहेब उमर वर्षें सात, रघुनाथराव दादा उमर वर्षें पंधरा[30], जनोबा बाबा उमर वर्षें तेरा. कारकीर्द इस्तकबिल श्रावण तागाईत फाल्गुन.—

१. शके १६६३, सन ११५१. स्वारी सुरंदभेलशाची व भूपाळची करून आली. यावर छ १३ जमादिलावल अधीक श्रावणमाशीं श्रीमंत भाऊसाहेब बारा हजार फौज घेऊन राजदर्शनास गेले. भाद्रपदमासपर्यंत साताऱ्यास होते. श्रीमंतांब्राबर भाऊसाहेब व सौभाग्यवती गोपिकाबाई. [ त्यांस ] घेऊन छ १७ रमजान ऊर्फ कार्तिकमाशीं निघाले ते बेलापूर पर्यंत गेले. गोपिकाबाई गरोदर होती. त्यांस व भाऊसाहेब यांस माघारे छ २२ जिलकादीं पुण्यास लाविलें. खांसा स्वारी हिंदुस्थानांत गेले. धारेस मोर्चे लाऊन घेऊन गढेमंडळास मोर्चे लाऊन छावणी केली. देशीं वाड्यांत तिघे खासे होते."[31]——कलम.

१. शके १६६४ सन ११५२ गढेमंडळ घेऊन, बंगाला व प्रयाग करून रघोजी भोंसले चालून आले त्यांस लुटून घेऊन, फौजेची दोन वर्षांचे नालबंदीची समजूत करून उमेदवार कारकून चारशें बराबर होते, त्याच्या तैनाता करून दिल्या. अखेरीस घरीं आले. वाड्यांत भाऊ साहेब व रघुनाथराव व जनोबा बाबा होते ते गंगास्नानास त्रिंबकीं जाऊन आले. सौभाग्यवती गोपिका बाई गरोदर होती त्यांस विश्वासराव पुत्र झाले.——कलम.

---

३०. रघुनाथराव शके १६४५ वर्षी जन्मले असें वर आलें आहे तेव्हां ते ह्या सालीं १७ वर्षांचे असावे.

३१. "हिंदुस्थानांत गढेमंडळ येथील खंडणी करून मकसुदाबादेहून भागीरथी स्नान होऊन सनसल्लास अर्बनांत अखेरीस आले." दुसरी बखर. पेशव्यांची बखर पृ० ७३ पहा.

१. शके १६६५, सन ११५३. खांसा स्वारी राजदर्शनास जाऊन पुण्यास आली; भाऊ साहेब गडा [ ? ] बेदनूर पर्यंत जाऊन सातारियास आली--कलम.

१. शके १६६६, सन ११५४. खांसा स्वारी छ १८ सवाल कार्तिकमासीं नाशिकास जाऊन कोंकणांत शिरून पुण्यास झाले. तोराऊ[३२] साहेबांबराबर भाऊ साहेब होते.- कलम.

१. शके १६६७ सन ११५५. भाऊसाहेब व दादासाहेब व जनोबा बाबा साताऱ्यास जाऊन राजदर्शन घेऊन पुण्यास आले. महादाजी आबाजी पुरंदरे कारभारी स्वारी झेलसें करून छ १३ रज्जबीं, श्रावणमासांत आले. या सालास श्रीमंतांस मोधवराव[३३] साहेब पुत्र झाले—— कलम.

१. शके १६६८, सन ११५६. खांसा स्वारी राजदर्शन घ्यावयास गेले. तेथें निरोप घेऊन खांसा व दादासाहेब व जनोबा व विश्वासराव व सौभाग्यवती गोपिकाबाई सुद्धां निघोन छ १० रबिलावलीं पंढरीस जाऊन छ २४ जमादिलावलीं पुण्यास दाखल झाली. भाऊसाहेबांची स्वारी निराळी कारभारी सखारामपंत[३४] बोकील, निसबत पुरंदरे, फौज बरोबर घेऊन कर्नाटकांत जाऊन बाहादूर बिंडा घेऊन बेदनुराकडून वगैरे छ ३ जिल्हेजीं गेले, ते छ २ जमादिलावलीं पुण्यास आले. मातोश्री ताई[३५] काशीयात्रा करून घरास आली. जनोबाबाबा यांचा काळ झाला. कलम.

१. शके १६६९, सन ११५७. खांसा स्वारी व कारभारी छ ८ जिल्हेज मार्गशीर्षमासीं निघोन, फौजेस नालबंदी देऊन, खानदेशांतून बेदरपर्यंत गेले. तों नासिरजंग व कारभारी रामदासपंत ऐसे चालोन आले. लढाई होतां असीउंबरीवर येऊन तह झाला. छ[३६] ९ रबिलावलीं पुण्यास येऊन हिंदुस्थान ममसुदाबाद प्रांतीं जाऊन छावणी केली. कलम.

१. शके १६७० सन ११५८. खांसास्वारी हिंदुस्थान प्रांतीं छावणीस होते

---

३२. ताराऊ=ताराबाई. इजला यात्रेस नेलें होतें असें दिसतें.

" स्वारी झेलसें पायगडावरून उज्जनीची खंडणी घेऊन माघारे आले. भाऊ साहेब कोंकणांत किल्ले पहावयास गेले. मग येऊन बयाबाईचें लग्न केलें " असें दुसऱ्या बखरींत आहे. बयाबाई ही चिमाजी आप्पा यांची मुलगी. ही ओंकार यांजकडे दिली.

३३. माधवराव यांचा जन्म सावनूर येथें झाला. बाईसाहेबांची व माधवरावांची ओज व जतन नबावसाहेब यांणीं नीट ठेविली त्यावरून माधवराव नबावांस ' मामा ' असें म्हणत असत.

३४. हे प्रसिद्ध सखारामपंत बापू. यांचा वाडा सासवडास आहे. यांस हिवरें गांव इनाम होतें.

३५. ताई-ह्या कोण ? बाजीरावाचें कुटुंब काशीताई ?

३६. येथें ९ किंवा ५ हें स्पष्ट कळत नाहीं.

तिकडील खंडण्या ममसुद्दाबादेसुद्धां घेऊन, प्रयागस्नान करून, देशीं आले. पस्तीस हजार फौजेस नालबंदी देऊन, महादाजी आबाजी पुरंदरे यांस घरीं ठेवून, फौजेसुद्धां राजदर्शनास गेले. कलम.

१. शके १६७१, सन ११५९. खांसास्वारी फौजेसुद्धां साताऱ्यास असतां महाराजांचे शरीरास अस्वस्थ झालें. तेव्हां अष्टप्रधान व भोंसले वगैरे यांजवळ फौज थोडी, प्रधान यांजवळ फौज भारी पाहून, राज्याची बंदोबस्ती करावयास आज्ञा करून, मार्गशीर्ष शुद्ध नवमीस देह विसर्जन झालें. तेव्हां बाई सती जावयास तयार झाली. त्यांचें साहित्य करून, मिरवत क्षेत्र माहुलीस आणून कृष्णेंत दहन केलें. बाई सती गेली व दोन नाटकशाळा[३७] बराबर गेल्या. तेथें कृष्णेंत जागा बांधली आहे. महाराज ताराऊसाहेब राजाराम यांची स्त्री राजेश्रींनीं आ ज बें त ठेविली होती. वाड्यांत तिचा बंदोबस्त करून पानगांवीं ताराऊसाहेब यांची नात दरयाबाई निंबाळकरीण ताराऊसाहेबांचा लेक वेडा शिवाजी [ त्या ] चा लेक राजाराम यांचा भाऊ[३८] होता त्यास ताराऊ साहेब गुप्त खर्चास पाठवीत होती. त्यास निंबाळकरणीनें पानगांवास आणिलें. हें वर्तमान राजेश्रींस कळलें होतें. त्यांनीं खंडेराव न्यायाधीश यांस पाठविलें.

महाराजांचा काळ झाला तेव्हां श्रीमंतीं मातबर माणूस व फौज पाठवून निंबाळकरीण बाई सुद्धां साताऱ्यास आणून समारंभ, अन्नसत्र [ करून ] सिंहासनीं राज्यावर स्थापिलें.[३९] छ ८ सफर पौषमास. अष्टप्रधानांस वस्त्रें झालीं. राजाराम राजे, प्रधान बाळाजी बाजीराव, याप्रमाणें होऊन प्रतिनिधीचे मुतालीक यमाजी शिवदेव यांस कैद करून किल्यास पाठविलें. ताराऊसाहेबांचा व हुजूरदार [ ? ] राजेश्रींकडून यांचा बंदोबस्त करून नाना पुरंदरे तेथें कारभारावर ठेविले. भाऊसाहेब यांजबराबर फौज देऊन सांगोल्याकडे पाठविलें. खांसे पुण्यास येऊन, चिरंजीव विश्वासराव यांस दीक्षित पटवर्धन यांची कन्या वधू करून, मोठा समारंभ झाला. लग्नसिद्धी झाली. अष्टप्रधान वगैरे सर्व लग्नास आले होते. वाड्या भोंवतीं वाडे होते ते पाडून मंडप केले होते. पुण्याची वस्ती वाढूं लागली. रंगभट्ट ढेंकणे वगैरे यांचे वाडे पाडले होते त्यांस दुसरी जागा नेमून दिली. नंतर जयापा[४०] शिंदे यांस कारभारी रामचंद्रबाबा शेणवई

---

३७. नाटकशाळा=राखा; उपस्त्रिया.

३८. 'यांचा भाऊ होता' ह्या शब्दांचा संबंध व अर्थ दुर्बोध आहे.

३९. रामराजास गादीवर बसविण्याचे कामीं जी खटपट झाली ती 'थोरले शाहू महाराज यांचें चरित्र' पृष्ठ ९८–१०१ यांत वर्णिली आहे.

४०. जयापा हा राणूजीचा मुलगा. ह्यानें मारवाडांत नागोर शहरास वेढा घातला असतां त्यास मारेकऱ्यांनीं मारिलें. भाऊसाहेबांची बखर पृ० १५।१६।१७ पहा.

सरकारांतून नेमून दिले होते त्यांचें व सरदारांचें न बने कारितां मल्हारजी होळकर यांचे विचारें दूर केले. आणि उभयतां सरदार हिंदुस्थानांत स्वारीस पाठविले. कलम.

१. शके १६७२ सन ११६०. खांसास्वारी व महादाजी आबाजी पुरंदरे फौजेस नालबंदी देऊन श्रावणमाशीं डेऱ्यादाखल होऊन चरोळीचे तळावर गेले. तेथें भाऊसाहेब सांगोल्याकडून आले. रामचंद्रबाबा भाऊसाहेबांस भेटले होते. त्यांस घेऊन श्रीमंतांस भेटविलें. आणि श्रीमंतांजवळ बोलणें घातलें कीं, कारभार आम्हीं करूं. तेव्हां हें बोलणें रामचंद्रबाबाचे संकेतें असें समजलें. तो मजकूर महादाजी आबाजी पुरंदरे यांस कळला. श्रीमंतांचें बोलणें झालें कीं, भाऊसाहेब कारभार करूं म्हणतात. तेव्हां पुरंदरे यांणीं उत्तर केलें कीं, आम्ही चाकर, भाऊसाहेब भाऊ आहेत, त्यांचें न ऐकिल्यास दौलत [४१]फांटेल. असें म्हणून निरोप घेऊन पुण्यास आले. भाऊ साहेबांस रामचंद्र बाबांनीं पुढें करून नजर छत्तीस लक्ष रुपये दिले. पुरंदरे यांचे विद्यमानें फौजेस नालबंदी पावून तयार होती. भाऊसाहेब व रामचंद्रबाबा कारभार करूं लागले. तों निजाममुलुक यांचे लेक नासरजंग व सलाबतजंग व निजाम अल्लीखां व बसालतजंग व मोगल अल्ली [४२]फुलचेरीकडे आले होते. तेथें नासरजंग यांचा काळ जाला, ही खबर आली. त्यावरून भाऊसाहेब कर्नाटकांत जाऊन भागानगरास गेले. तों मागें दमाजी गाईकवाड साताऱ्यास आला. साताऱ्यास रामराजे राज्यावर होते त्यांणीं [व] ताराऊसाहेब यांणीं आपली आज्ञा चालवून दमाजी गाईकवाड बोलाविला. तो वीस हजार फौजेनिशीं आला. पुणें पळों लागलें. पुण्यास मुतालकीवर बाबा फडणीस होते. महादाजीपंत पुरंदरे आपले घरीं असतां उभयतांनीं विचार करून गाईकवाड यास चिठ्ठी पाठविली. तो पुण्यास न येतां साताऱ्यास गेला. नाना पुरंदरे तेथें होते. त्यांशीं व यांशीं लढाई होऊं लागली. ही बातमी भागानगरास जातांच शहरापासून सतरा लक्ष रुपये खंडणी घेऊन तेरावे दिवशीं साताऱ्यास दाखल झाले. गाईकवाड यास धरून कैद केला. साताऱ्याचा बंदोबस्त करून श्रीमंत पुण्यास गाईकवाडास घेऊन येऊन आवजी कवडे यांचे वाड्यांत मुजमदाराचे घरापुढें ठेविला. नंतर पर्वतीचे देवालयास काम लाविलें. व दक्षणेचे ब्राह्मणांस डोंगरासभोंवतीं सोपे बांधून देकारास जागा केली[४३]. कलम.

---

४१. पेशव्यांची बखर पान ६२ व टीप ८ पहा.

४२. फुलचरी=पांदेचरी.

४३. "खांसास्वारी बरोबर भाऊसाहेब कर्नाटकांत सावनूर पावेतों गेले. पुढें महादोबा बाबा रवाना करून उभयतां पुणियास आले. महादोबा अखेरीस आले. दमाजी गायकवाड सातारियास आले होते." दुसरी बखर.

१. शके १६७३ सन ११६१. श्रीमंत स्वारीस निघाले. कारभारी भाऊ साहेब व रामचंद्र बाबा. उमाबाई दाभाडी येऊन भेटली. त्यांचे संस्थानाचा बंदोबस्त केला. निजाममुलकाचा काळ झाला. नासरजंग हिदामुदीखाँ[४४]-नाचे लढाईंत मृत्यु पावला. सलतनत[४५] लुटली गेली सबब दक्षिणेस दुसरा सुभा यावा हें राजकारण शिंदे, होळकर यांस करावयास पूर्वीं लिहिलें होतें [ तें ] त्यांणीं करून आणिलें. महादाजी आबाजी कारभारांतून राहिले होते. त्यांस सरदारी देऊन, पुणें देशचा सुभा त्यांचे पुत्र नीलकंठ महादेव यांचे नांवें करून त्यांस स्वारी बरावर घेऊन गेले. हिंदुस्थानांतून मोठे फौजेनिशीं जयापा शिंदे व मल्हारजी होळकर हे दिल्लीहून पादशहापासून गाजुदीखान फरोजंग [ यांस ] दक्षिणेस सुभेदारी करून घेऊन येतात, ही बातमी आली. तेव्हां नासरजंग याचे धाकटे भाऊ सलाबतजंग व बसालतजंग व निजाम अल्लीखान व मोगल अल्ली भागानगरीं असतां त्यांस खबर कळली. त्यांणीं दिल्लीस पत्रें पातशहास पाठविलीं आणि श्रीमंतांकडे सरलष्करखान व जानोजी जसवंत निंबाळकर यांस बोलावयास पाठविलें. तों दिल्लीहून पत्र आलें म्हणून वकिलांचे लिहिणें श्रीमंतांस भाद्रपदमासीं आलें कीं, नबाबास पत्रें दिल्लीहून आलीं आहेत. तुमचें काम दक्षिणेचें तुम्हांस बहाल असे म्हणून आश्विन मासीं गाजुदीनखान व मल्हारजी होळकर व जयापा शिंदे फौजेसुद्धां औरंगाबादेस दाखल झाले. मसलतदार सय्यद हसमतखां व महंमदखान होते. त्यांनीं श्रीमंतांस सांगून पाठविलें कीं, शिंदे व होळकर उभयतां सरदार आपले भेटीस येतील. सय्यद लष्करखान व जानोजी निंबाळकर आले आहेत त्यांस निरोप न देतां बराबर घेऊन शहागडावर यावें. आम्हींही मागाहून येतों. आपले आमचे विचारें ठरेल तसें होईल. त्याजवरून श्रीमंतांनीं कूच करून, खान व निंबाळकर [ यांस ] घेऊन शहागडावर गेले. होळकर व शिंदे येऊन भेटले. मागाहून गाजुदीनखान यावे तों त्यास औरंगाबादेस नबाबाकडे मेजवानी झाली. मृत्यु पावले. श्रीमंतीं सरलष्करखान व जानोजी निंबाळकर यांस निरोप दिला. मल्हारजी होळकर हिंदुस्थानांत गेले. शिंदे देशीं राहिले. सरलष्करखान व निंबाळकर बसालतजंग यांस जाऊन भेटले. नंतर बिघाडीचा अर्थ पेशव्यांच्या दृष्टीस पडला तेव्हां मल्हारजी होळकर यांस पत्रें पाठविलीं. बसालतजंग व दिवाण रामदास पंत व इंग्रेज[४६] जंगी फरासी सामान सुद्धां मोठी फौज घेऊन चालून आले. तेव्हां

---

४४. हिदामुदी=हिदायत मोयदीनखान—हा निजामुल्मुल्क यांच्या लेंकीचा पुत्र. यास मुजफरजंग असेंही म्हणतात.

४५. सलतनत=जिंदगी, सर्वस्व.

४६. ‘इंग्रज’ हें चुकीचें आहे. हा फरांसीस मांशर बुस्सी हा होय.

महादाजी आबाजी पुरंदरे माजी [ ? ] असतां कारभारांतून मन काढून होते. सरकारचे फौजेवर ग्रहणाचे पौर्णिमेस छापा घातला. असा उंबरीवर मोगल आला. पुण्यांत पळण झाली. दुसरे दिवशीं लढाई होतां पाच हजार फौजेनें चालून महादाजी आबाजी पुरंदरे व दत्ताजी शिंदे व महादजी शिंदे बारगीर व कोन्हेर त्रिंबक एकबोटे वगैरे अकरा असामींनीं डोलीची[४७] अंबारी खालीं केली. तेव्हां सरकार फौज येऊन अंबारी लुटली. मोगल शिकस्त झाला. जहागीर देऊन सल्ला करून गेला. होळकर यांचीं पत्रें आलीं कीं, रोहिले पठाण कमाऊनचे पहाडांत आहेत. त्याचें निस्तनाबूद करावें असें होतें, परंतु स्वामीकडून एक दोन पत्रें आलीं कीं, कळेल तैसा निर्गम करून तुम्हीं येणें. त्यावरून रोहिले पठाण यांचा व वजिरांचा सलोका करून देऊन कूच करून, भागीरथी उतरून, दक्षणतीरास आलों; वजीरही एक दोन दिवसांत येतील; मजल दरमजल येत आहोंत; त्यास वजिराकडून व दिल्लीहून बातमी आली कीं, स्वामीचा व सलाबतजंगाचा सलोक जाला. त्यास सल्ला जाला नसला तरि तसेंच लिहून पाठवावें. मजल दरमजल येत आहोंत. सल्ला झाला असला तरि इकडेही कामकाजें आहेत, यामध्यें जसें वृत्त असेल तशी आज्ञा केली पाहिजे. मोंगलाचे छाप्यांत बाबूराव फडणीस यांचे पायांस गोळा चाटून गेला. रामचंद्रबावा कारभारी यांणीं कर्जाची* पट्टी लोकांवर घातली. कलम.

१. शके १६७४ [४८]सन ११६२. खांसा स्वारि, कारभारी भाऊ साहेब व रामचंद्रबावा, कर्नाटकांत जाऊन श्रीरंगपट्टण पर्यंत गेले. मार्गीं होळहुनूरचें ठाणें घ्यावयास मोर्चे लाविले. तेथें भाऊ साहेब व रामचंद्रबावा मोर्च्यांत तीन दिवस बसले होते. नंतर कोन्हेर त्रिंबक एकबोटे यांस आज्ञा केली. ते गेले. मागाहून श्रीमंतांजवळून कृष्णा पलांडा व रामजी पवार व रुपतराव व बाबाजी पडवळ वगैरे अकरा असामी कोन्हेर पंताजवळ जाऊन किल्यावर चढले. कृष्णाजी गोळी लागून ठार झाला. किल्ला फत्ते झाला. अकरा असामींस बक्षिसें दिलीं. पलांडा मजकूर यास मु ख ई ची [ ? ] पाटिलकी दिली. रघुनाथ बाजीराव यांची स्वारी निराळी करून सखाराम भगवंत कारभारी दिले. त्यांणीं आमदाबादेस जाऊन हिंदुस्थानांत शिंदे होळकर [यांसह] गेले. खांसा स्वारी करनाटकांतून घरास आले. रामचंद्र बाबा कारभारास आहेत. गणपतीच्या

---

४७. डोलाची अंबारी=झोंपा घेतां येईल अशी ? ही खांसेनबाबाची असावी.

* हें या स्वारीचें कर्ज असावें.

४८. "स्वारी बरोबर भाऊ व दादा मासिक पावेतों होते. पुढें खांसा व भाऊ कोंकणांतून पुणियास आले. दादा साहेब गुजराथेंत आमदाबाद घेऊन था (?) लनेरीं होळकर सुद्धां मिळोन हिंदुस्थानांत गेले." दुसरी बखर.

मागें लक्षुमणपंत कोणी गृहस्थ नांदत होते त्यांची जागा घेऊन घर बांधिलें. तेथें तीन वर्षें कारभार करून मृत्यु पावले. त्यांस दत्तपुत्र सदाशिव रामचंद्र झाले. पुरंदरे घरीं होते त्यांस सरदारी सांगितली. त्यांत हरी गोपाळ सुपेकर सरदारीवर होते. सुभ्याचें काम नारो आपाजी करीत होते. विजयदुर्ग व सुवर्णदुर्ग वगैरे कोंकणांत, तेथें अम्मल इदलशाई विजापुराकडील प्रथम, नंतर अमात्य बावडेकर, नंतर कान्होजी आंग्रे वर्षें वीस, त्याचा लेंक सखोजी त्यास लेंक संभाजी व मानाजी, त्यास लेंक संभाजी, त्यास तुळाजी, त्यास लेक मानाजी कुलाब्याकडे असत. कलम.

१. शके १६७५ सन ११६३. देशीं स्वारी असतां माधवराव साहेबांचें लग्न शिवाजी बल्लाळ[४९] पागेकडे अशी [ ? ] उंबरीस होते. त्यांची कन्या सौभाग्यवती रमाबाई निश्चय करून लग्न केलें. बाबा व बाबुराव फडणीस व आबा मुजुमदार व महिपतराव चिटणीस व कृष्णराव पारसनीस व कोन्हेर त्रिंबक एकबोटे यांस पालख्यांचीं वस्त्रें दिलीं. दादा साहेब व कारभारी सखारामपंत हिंदुस्थानांत छावणीस आहेत. कोंकणांत अम्मल आंग्रे यांचा. महादाजी आबाजी पुरंदरे घरीं. कारभारास भाऊ साहेब आहेत.[५०] कलम.

१. शके १६७६ सन ११६४ श्रीमंत देशीं सिंहस्थास गंगातीरास जाऊन आले. महादाजी आबाजी पुरंदरे यांबरोबर सरकारचे कारखाने व फौज देऊन तोफखाना नवा सजवून माधवराव पानसे कुळकर्णी मौजे सोनोरी[५१] तालुके करेपठार यांस कारखाना सांगोन बराबर देऊन कर्नाटकांत पाठविलें. त्यांनीं कर्नाटकांत जाऊन बिदनूरची खंडणी घेऊन, अखेरीस सासवडास आले. कारखाने व निशाणें सरकारांत पाठवून दिलीं. स्वारींतून मुशाफरजंग, गारदियांचा सरदार, पळून गेला. दादासाहेब हिंदुस्थान छावणी कुंभेरीकडे. कारभारी सखारामपंत बापू. कोंकणांत आंग्रे यांजवर स्वारी आली. खंडोजी माणकर व रामाजी महादेव व संक्राजी निळकंठ वगैरे जाऊस किल्ले घेऊन अम्मल सरकारी झाला. पर्वतीचे देवळाचें काम तयार झालें. पूजा एका-

---

४९. हे सोलापूरकर जोशी.

५०. "स्वांसास्वारी व भाऊ माधवराव यांचें लग्न करून कर्नाटकांत गेले. तेरदळ, जमखिंडी घेऊन माघारे आले. दादा साहेब हिंदुस्थानांत कुंभेरीस गेले." दुसरी बखर. तेरदळ हल्लीं सांगलीकरांकडे आहे.

५१. सोनोरी ता० पुरंदर हा गांव पानसे यांस इनाम आहे. जवळच मल्हारगड नांवाचा किल्ला आहे तो त्यांजकडे होता. हल्लीं सोनोरी येथें पानशांचीं मुख्य तीन घराणीं आहेत. माधवराव हे शिवाजी माणकेश्वर यांचे चिरंजीव. पानशांच्या घराण्याची संक्षिप्त हकीगत वरील माधवराव पानशे यांचे वंशज केशव बापूराव पानशे यांणीं आह्मांकडे पाठविली आहे याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहों.

दशीस खांसे जाऊन करूं लागले. पर्वती संस्थान केलें. चतुर्थीस थेउरास स्वारी जात होती. थेऊर व आळंदी व गणेशखिंड व [?] पाषाण या मार्गे झाडें लाविलीं[५१]. पुण्याची वस्ती वसली. शेतें मोडून वसाहत झाली. स्वारी सासवडास जाऊन महादाजी आबाजी पुरंदरे यांस पुण्यास घेऊन[५२] आले. कलम.

१. शके १६७७ सन ११६५. श्रीमंतांस नारायणरावसाहेब पुत्र झाले. दादा साहेब हिंदुस्थानांतून तीन वर्षें छावणी करून आले. कारभारी सखारामपंत असतां कृष्णराव बल्लाळ[५३] काळे व विसाजीपंत लेले व चिंतो विठ्ठल त्यांजवळ आहेत. जानकीबाई दादासाहेबांची स्त्री निवर्तली. दुसरें लग्न कृष्णातीरीं गलगलें येथें स्वारींत झालें. सौभाग्यवती[५४] आणंदीबाई नांव ठेविलें. सलाबतजंग भागानगरींहून चालून आले त्यांशीं सल्ला केला. सावनुरांत मुरारजी घोरपडे हिंदुराव त्यास पेशजी स्वारींतून मुजाफरजंग रुसून गेला होता तो त्यांशीं मिळून सावनूर बळाऊन लढाई लागली. त्यानवर श्रीमंत व भोंसले नागपूरकर व नबाब [अशी] लाख फौज जमा झाली. मोर्चे लाविले. ते सालीं महादाजी आबाजी व कोन्हेर त्रिंबक घरीं होते त्यांस बोलावून घेतलें. मुसाभुशी फिरंगी नबाबाकडील त्यानें तोफांचा मार देऊन गांवकुसूं पाडिलें. हल्ला जाला. कोन्हेर त्रिंबक यांस कपाळास गोळी चाटून गेली. भाऊसाहेब व पुरंदरे मोर्च्यांत होते. मुराररराव घोरपडे कौल घेऊन गुत्तीस गेले. सल्ला जाला. मुजाफरखान चाकर ठेवून श्रीमंतांनीं बराबर घेतला. निजामअल्ली भागानगरास गेले. नागपुरास भोंसले निरोप घेऊन गेले. पर्वतीस तळ्याचें काम लाविलें. खासे जाऊन बसत होते[५५]. कलम.

१. शके १६७८[५६] सन ११६६. खांसा स्वारी फौजेनिशीं नालबंदी देऊन साठ हजार फौज घेऊन कारभारी भाऊसाहेब [असे] कृष्णातीरास गेले. करनाटक प्रांतींचे वकील आले. खंडण्याचा करार करून घेऊन तोफखाना

---

५१. नित्य आळंदीस जाणाऱ्या एका गौळी जातीच्या वारकऱ्यानें झाडें लाविलीं असें सांगतात तें ह्या वरून खोटें ठरतें.

५२. "खांसा स्वारी कृष्णेपर्यंत जाऊन माघारी आली. नंतर सिंहस्थाकरितां नासिकास गेले. दादा साहेब हिंदुस्थानांत." दुसरी बखर.

५३. कृष्णराव हे निजामाकडील पेशव्यांचा प्रसिद्ध वकील जो गोविंदराव काळे त्याचे तीर्थरूप.

५४. ही ओक यांची कन्या.

५५. "कुंभेरीहून दादा देशीं आले. जानकीबाई प्रसूत होऊन मरण पावली. उपरांत गलगल्यास लग्न करून सावनुरास स्वारीस (खांसाकडे) गेले. याच सालीं तुळाजी आंग्रे धरून आणिले." दुसरी बखर.

५६. "सु॰ स॰ सब्बा खमसैन (मया व अल्लफ् ११५७ इ॰ स॰ १७५६) खांसा स्वारी श्रीरंगपट्टणास गेली. बरोबर माऊ. दादासाहेब कितुरास." दुसरी बखर.

जंगी सामानें बरोबर असतां श्रीरंगपट्टणास गेले. तेथें कुंभार राजा. त्याजवळ हैदर नाईक जमादार होता. मोर्चे देऊन सत्तावीस दिवस लढाई केली. खांसा भाऊ साहेब मोर्च्यांत होते. मोर्च्यांतील तोफ एक फुटली त्यानें माणसें जायां झालीं. नंतर सल्याचें बोलणें होऊन, छत्तीस लाख रुपयांचे होन व पंधरा लक्षांची हुंडी, एकूण एकावन लक्ष रुपये खंडणी घेऊन श्रीमंत ज्येष्ठमासीं तुंगभद्रेवर आले. नदीस पाणी फार होतें. श्रीमंतांनीं पूजा करून प्रार्थना केली. उतार होऊन लष्कर उतरून आलें. पुढें कृष्णेवरही याप्रमाणें झालें. लष्कर उतरून पार आलें. श्रीमंत आलीकडे आल्यावर कृष्णेस पाणी पूर्ववत् प्रमाणें जाहलें! दर कूच निघोन सत्ताविसावे दिवशीं पुण्यास दाखल जाहले. दादासाहेब यांस कारभारी सखाराम भगवंत हे व होळकर समागमें स्वारी हिंदुस्थानांत पाठविली. कलम.

१. शके १६७९ सन ११६७. स्वारी श्रीमंत विश्वासराव, कारभारी बाबूराव फडणीस, सरदार दत्ताजी शिंदे, फौज सुद्धां व हुजरात पागा व सरदार निजाम अल्लीखां याजवर रवाना केलें. त्यांजकडील वकील पांच लक्ष रुपयांची जहागीर देतों म्हणोन बोलण्यास आले. तें श्रीमंतांनीं न ऐकतां बिघाड दाखविला. नबाब चालून आले. बरोबर विठ्ठल सुंदर दिवाण होते. निजाम अल्लीखां येतात हें ऐकून भाऊसाहेब फौजे सुद्धां डेरां दाखल होऊन मागाहून चालले. हुजुरात पंचवीस तीस हजार घेऊन कूच दर कूच नाशकास जाऊन, गंगास्नान करून, नगर किल्याजवळ फरा [ ! ] बागांत मुक्काम केला. विश्वासराव यांची व नबाब बहादुर यांची लढाई होऊं लागली. दत्ताजी शिंदे यांनीं तरवार फार केली. नबाब शिकस्त होऊन पंचवीस लक्ष रुपयांची जहागीर व किल्ले देऊन सल्ला केला. उभयतां श्रीमंतांच्या भेटी झाल्या. या पूर्वीं नबाबाची भेट विश्वासराव यांनीं भगवंतराव कडेकर [ ! ] याचे विद्यमानें घेतली होती. नबाब निघोन गेले. उभयतां श्रीमंत पुण्यास आले. हिंदुस्थानांत दादासाहेब छावणी करून राहिले. कारभारी सखारामपंत व जनार्दन बल्लाळ फडणीस होते. त्यांत फडणिसांचा काळ झाला. कलम.

---

५७. जंगीसामान=लढाऊ सामान, दारु गोळा वैगेरे.

५८. यावरून व मागील पुढील मजकुरावरून भाऊस लढाईचा सराव नव्हता असें बिलकुल होत नाहीं.

५९. "सु॰ स॰ संमान खमसैन (म॰ अ॰ ११५८ इ॰ स॰ १७५७) खांसास्वारी बराबर भाऊ तांदुळजे पर्यंत गेले. नबाब निजामअल्लीखां याजपासून २५ लक्षांची जहागीर घेतली. दादासाहेब कितुरास." दुसरी बखर.

६०. भाऊ साहेबांची बखर पृ॰ ३६ व ३७ पहा.

१. शके १६८० सॅन ११६८. खांसा स्वारी निघोन पुळ्याचे गणपतीस गेली. भाऊसाहेब पुण्यांत आहेत. त्यांनीं सदाशिवपेठेस कौल देऊन नवी वस्ती केली. नांव सदाशिव पेठ ठेविलें. पुण्यास चिरेबंदी कुसूं घालावयास कारखाना लाविला. शिमग्याचा रंग मोठा केला. श्रीमंत कोंकणांतून पर्वतीस आले. भाऊसाहेब भेटीस गेले. भेटी होऊन वाड्यांत आले. रंग सर्वत्रांवर टाकिला. रंगाची चाल वाड्यांत चालू झाली. रघुनाथ बाजीराव हिंदुस्थानांत छावणीस होते ते लाहोर पर्यंत ठाणीं बसवून आश्विनमासीं पुण्यास दाखल जाहले. खंडेराव हत्ती आणिला. या सालीं देकारास पर्वतीवर दरवाज्यास तट बांधून अठरा लक्ष रुपये ब्राह्मणांस देकार दिला. ऐशीहजार ब्राह्मण[६१] जाले. कलम.

१. शके १६८१ सॅन ११६९.[६२][६३] भाऊसाहेब कारभारी असतां दादासाहेब यांणीं लाहोरपर्यंत मुलूक काबीज केला, परंतु खजिना कांहीं आणिला नाहीं. यामुळें दादांची स्वारी घरीं राहून भाऊसाहेब हिंदुस्थानांत जावयास डेरे दाखल जाले. तेथें मुजाफरजंग, गारदी यांचा सरदार, याणें [ केलेली ] भाऊसाहेबांस मारावयाची कृति व पुढें हिंदुस्थानांत पाणिपतावर भाऊसाहेब बुडाले याचे तपशीलाची कारकीर्द आलाहिदा आहे.[६४] पुण्याहून जातांना नगरचा किल्ला घेतल्याचा व मोगलाशीं लढाई घेऊन पांसष्ट लक्ष रुपयांची जहागीर व दौलताबाद किल्ला घेतला हा सर्व पर्याय सदर्हू पै ख तीं त आहे. श्रीमंत खांसा व रघुनाथ बाजीराव व माधवराव साहेब व नारायणराव व सौभाग्यवती गोपिकाबाई बराबर तांदुळजेपर्यंत होतीं. पुढें चैत्र शुद्ध १ स शिंदे होळकर यांचीं पत्रें आलीं. सबब श्रीमंतांचा निरोप घेऊन, विश्वासराव सुद्धां निघोन हिंदुस्थानांत गेले. श्रीमंत पुण्यास आले. पुण्यास चिरेबंदी कुसाचें काम लाविलें. जिवाजीपंत अण्णा खासगीवाले यांजकडील कारखाना चालत होता. भाद्रपदमासीं पाऊस

---

६१. "सु० स० तिस्सा खमसैन (म० अ० ११५९ इ० स० १७५८) दादा साहेब कितुराहून देशीं दसरियास आले." दुसरी बखर. वर तर दादा हिंदुस्थानांत गेले असें म्हटलें आहे.

६२. पेशव्यांची बखर, पृ० ७१ टी० ३० पहा.

६३. "सु० स० सितैन [ म० अ० ११६० इ० स० १७५९ ] भाऊ साहेब नगरचा किल्ला घेऊन हिंदुस्थानांत गेले." दुसरी बखर. हिंदुस्थानांत पुढील सालीं गेले.

६४. ही हकीगत ह्याच लिहिणारानें लिहिली असल्यास फार तपशीलवार असली पाहिजे. पण ही प्राप्त कशी होते ? अलीकडे आम्हांस एक वर लिहिल्या प्रकारची कैफीयत मिळाली आहे परंतु ही तीच कीं काय हा पक्का निर्णय होत नाहीं. हींत मुजफरजंगाचा फितूर वगैरे हकीकत आहे. पुढें पाणिपतचीही आहे. शेवटीं हींतील मजकूर भाऊ साहेबांच्या बखरींतील मजकुरासारखा अक्षरशः आहे.

फार झाला. पर्वतीचे ओढ्यास पाणी आलें. श्रीमंतांचे घरीं बाजीराव व चिमाजी आप्पा यांचा पक्ष होता त्याची दक्षणा पर्वतीवर ब्राह्मणांस दिली. त्या वेळेस ओढ्यांत ब्राह्मण बुडाले.[६५] कलम.

१. शके १६८२ सनें ११७०. श्रावणमासीं तेरा दिवसांचा पंधरवडा पडला. पौषमासीं पाणिपतावर भाऊसाहेब फौजे सुद्धां बुडाले. खांसा स्वारी पुण्यास होती. चिंचवडचे देव धरणीधर महाराजांस रुप्याचा देव्हारा व हत्ती व खर्चास मौजे बाणेरें इनाम करून दिलें. महादाजी आबाजी पुरंदरे यांचा काळ कार्तीकमासीं जाहला. खांसा स्वारी भाऊसाहेबांचे मदतीस फौज सुद्धां निघाली. जानोजी भोंसले नागपूरकर बरोबर घेतले. रघुनाथ बाजीराव यांस नबाबावर रवाना केले. खांसा स्वारी व पुत्र माधवराव व नारायणराव व सौभाग्यवती गोपिकाबाई फौजे सुद्धां नगरावरून पैठणास गेले. तेथें देशस्थ सावकार यांची कंन्या नवरी पाहून लग्न मार्गशोर्षमासीं केलें.[६६] पुढें दरकूच नर्मदातीरास गेले. तेथें पौषशुद्ध त्रयोदशीस पाणिपतचें वर्तमान ऐकिलें.[६७] नंतर नर्मदा उत्तर तीरास जाऊन दरकूच खेचीवाड्यांत राघोगड किल्ल्यानजीक दाखल झाले. बराबर भोंसले नागपूरकर व हुजुरात मिळून पस्तीस हजार फौज होती. तेथें वर्तमान ऐकिलें कीं, भाऊ साहेब यांची फत्ते जाहली. दुसऱ्यानें ऐकिलें कीं, विश्वासराव ठार झाले [व] भाऊसाहेब यांचा ठिकाण नाहीं. हें ऐकून खाशांनीं निळकंठ महादेव पुरंदरे यांबरोबर महादजी शितोळे व जगतापवगैरे हुजुरात देऊन कटक किल्ल्यावर पाठविलें. किल्ला कौलास आला. तों आबद अल्ली [?] कडील वकील आला. त्याची भेट घेऊन श्रीमंत निघोन ब्ऱ्हाणपुरावर आले. तों नाना पुरंदरे व बाळाजी जनार्दन फडणीस व त्यांची स्त्री व श्रीमंतांची स्त्री सौभाग्यवती पार्वतीबाई व लोक तमाम पळ आला तो येऊन भेटला. श्रीमंत निघोन वैशाखमासीं पुण्यास आले. पूल बांधावयास काम लाविलें. नित्य पुला-

---

६५. हा आंबीलओढा. "मी गेलों! रे गेलों!!" असें ओरडत कोंकणांतील कांहीं ब्राह्मण एका पाठीमागून एक आंबील ओढ्यांत बुडाले म्हणून एक विनोदपर आख्यायिका आहे ती वरील गोष्टीस अनुलक्षूनच काय?

६६. सु० स० इहिदे सितैन [म० अ० ११६१ इ० स० १७६०] "पैठणास लग्न करून हिंदुस्थानांत खेचीवाड्यापर्यंत गेले. तेथें पाणिपताचें वर्तमान आलें. दादासाहेब गु ड म ठ क ल [?] पावेतों गेले" दुसरी बखर.

६७. पौष शुद्ध ८ बुधवार.

६८. ब्राह्मण लोकांतील देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे [करहाडे] या तीन जातींचें सर्व प्रकारें ऐक्य व्हावें म्हणून नाना साहेबांनीं तिन्ही जातींच्या ब्राम्हणांच्या मुलींशीं स्वतां लग्न केलें असें ऐकिवांत आहे. प्रस्तुत मुलगी वाखरे यांची होती. कऱ्हाडे यांची मुलगी केल्याचा दाखला अद्यापि कोठें सांपडत नाहीं.

चे कामावर स्वारी जात होती. सहा[69] दिवसांत काम तयार झालें. भाऊसाहेबांचे शोधास कागद देऊन जासूद पाठविले होते. विश्वासराव मृत्यु पावले हा शोक मोठा झाला. तेणेंकरून शरीर अस्वस्थ झालें. वाड्यांतच स्वारी होती. रघुनाथ बाजीराव बेदरचे स्वारिहून आले त्यांस व माधवराव साहेब, सखाराम भगवंत, निळकंठ महादेव पुरंदरे यांचे परस्परें एकमेकांचे हातांत हात घालून, राज्य राखावें म्हणून आज्ञा सांगून आपण पर्वतीस राहिले. ज्येष्ठ वद्य प्रतिपदेस—कलम.

१. शके १६८३ सन ११७१. खासे यांणीं राज्याचा बंदोबस्त सांगून पर्वतीस राहिले होते तेथें त्यांचा काळ ज्येष्ठ वद्य षष्ठीस झाला. जवळ कृष्णराव पारसनीस व कोन्हेर त्रिंबक होते. गोपिकाबाई व नाटकशाळा पलीकडे खोलींत होत्या. काळ जाहला तेव्हां रघुनाथ बाजीराव जवळ आले त्यांणीं मांडी दिल्ही. माधवराव साहेबही होते. सायंकाळीं सर्वत्र मिळोन लांकडी पुलाजवळ नेऊन सार्थक केलें. अवतार समाप्त झाला[70].

---

## कारकीर्द माधवराव बल्लाळ.

१. शके १६८३ सन ११७१. श्रावणमासीं श्रीमंत व चुलते रघुनाथ बाजीराव कारभारी निळकंठ महादेव पुरंधरे व सखाराम भगवंत फौजेसुद्धां सातान्यास जाऊन रामराजे व ताराऊ साहेब यांचीं वस्त्रें जड जवाहीर शिक्के कटार घेतली. रघुनाथ बाजीराव यांस व दरकदार व अष्टप्रधान यांस व मुत्सद्दी यांस व निळकंट महादेव[71] यांस दिवाणगिरी व हुजूर मुतालकीचीं वस्त्रें दिलीं. निरोप घेऊन पंत प्रधान पुण्यास आले. कार्तिकमासीं नवाब निजाम अल्ली चालून येतात सबब स्वारी निघोन मुकाबल्यास[72] गेली. तो मोगल उरळीवर[73] आला. श्रीमंताचा व नबाबाचा तह होऊन नबाब भागानगरास गेले. श्रीमंत करनाटकांत स्वारीस गेले. महाराज ताराऊ साहेब यांचा काळ झाला*.

---

६९. 'साठ' असेंही होईल. पण साहा असेंच असावेंसें वाटतें. हा पूल कोणता? लकडी पूलच काय?

७०. ओंकारेश्वराजवळ ब्राम्हण जातीचे लोक शेवटील संस्कार करतात हा आलीकडचा प्रचार असें ह्यावरून होतें. नाना साहेबांची समाधी लकडीपुलाजवळ आहे म्हणून सांगतात.

७१. हे पुरंदरे अंबाजीपंताचे नातु व महादाजी पंताचे पुत्र.

७२. मुकाबला=सामना, लढाई.

७३. उरळी कांचन, ता० हवेली.

*नाना व भाऊ हे निवर्तल्याचें कधीं ऐकेन अशी जी ताराबाईची अत्युत्कट इच्छा ती तृप्त होऊन नंतर बाई परलोकीं गेली!

प्रधान यांजकडील कारकून होते त्यांनीं सार्थक केलें. नारायणराव बल्लाळ यांचा व्रतबंध रघुनाथ बाजीराव यांनीं केला. कलम.

१. शके १६८४ सँन ११७२. श्रीमंत रघुनाथ बाजीराव व माधवराव बल्लाळ, व नारायणराव बल्लाळ, कारभारी निळकंठ महादेव, व सखाराम भगवंत पुण्यास असतां श्रावणमासचा देकार ब्राम्हणांस पर्वतीस जाहला. रघुनाथ बाजीराव यांची स्त्री आनंदी बाई[ई]स पुत्र वँडगांवचे बागेत वाड्यांत भास्करराव झाले. नंतर भाद्रपदमासीं श्रीमंत निघोन गंगातीरास गेले. बरोबर निळकंठ महादेव व सखाराम भगवंत. पुण्याचे मुक्कामीं पंत प्रधानांजवळ त्रिंबकरावमामा कारभार करूं लागले. हरिपंत फडके, गोपाळराव गोविंद पटवर्धन व बाबुराव नाईक व पिराजी नाईक निंबाळकर व हुजुरात पागा डेरेदाखल जहाले. रघुनाथ बाजीराव यांनीं नबाबाकडील मुरादखान फौजेनिशीं बराबर घेऊन, कारभारीसुद्धां फौज चालून आली. श्रीमंत पंत प्रधान, त्रिंबकरावमामा फौजेसुद्धां चालून गेले. मुकाबला व्हावा तों खाशांच्या शरीरीं अस्वस्थ होतें. लढाई झाल्यावर दुतर्फा दौलत सरकारची खराबी होईल हा विचार करून पंत प्रधान जाऊन भेटले. उभयतां एक अंबारींत बसून डेऱ्यांत दाखल झाले. बापजी नाईक व गोपाळराव गोविंद व पिराजी नाईक व हरीपंत फडके निघोन गेले. श्रीमंतांचे डेरे [ सभोंवतीं ] रघुनाथ बाजीराव यांचे लोक तीन दिवस बसले. नंतर सखाराम भगवंत व निळकंठ महादेव यांनीं श्रीमंतांचे देण्याचे यादीवर रघुनाथ बाजीराव यांची रुजू करीत जावें ऐसा तह होऊन डेऱ्याजवळ लोक होते ते उठविले. कारभारी व पंतप्रधान यांचा कारभार चालला. चिंतो विठ्ठल यांस फडणिसीचें काम सांगितलें होतें. निळकंठ महादेव यांस पुरंदर किल्याच्या सनदा देऊन तेरा लक्ष रुपयांचा सरदारीस सरंजाम दिला

---

७४. "सु० स० सल्लास [ तिसैन म० अ० ११६३ इ० स० १७६२ ] घोडनदीवर दादा साहेब यांशीं लढाई होऊन उपरांत दादा साहेब सुद्धां मिरज घेऊन भागा नगरास गेले. मोंगलांनीं पुणें जाळलें." पु० ब०.

७५. वडगांव कोणतें ?

७६. दादासाहेब.

७७. त्रिंबक विश्वनाथ पेंठे—हे सदाशिव राव भाऊंचे मातुल. भाऊंचें प्रेम जसें नाना साहेबांच्या मुलांवर होतें तसेंच त्रिंबक रावांवेंही होतें. यांजकडे पुष्कळ पागा असून त्या निमित्त गांव व कुरणें हीं बहुत होतीं. बहुळ ता० खेड नजीक भीमानदीच्या काठीं यांचीं कुरणें व जमीनी बऱ्याच असून नदीचे तीरीं उंचवटयावर यांचा एक बंगला आहे. तसेंच सायगांव ता० खेड हें त्यांजकडे जाहगिरींत होतें. पुण्यांतील यांच्या वाड्यांत हल्लीं बोर्डिंग आहे !

७८. या बद्दल माधवरावाची फार वाखाणणी करितात. अल्पवय व हातीं सत्ता असून इतका दूरवर विचार करणारे राजपुरुष आपणांमध्यें फारच विरळा !

व सखाराम भगवंत यांस नऊ लक्ष रुपयांचा सरंजाम दिलें व महिमतराव चिटणीस यांस हजार राऊतांची सरदारी सांगून तीन लक्ष रुपयांचा सरंजाम दिला. नबाबाकडील मुरादखान आले होते त्यांचा सन्मान करून निरोप दिला. रघुनाथ बाजीराव व पंतप्रधान व कारभारी फौजेसुद्धां साताऱ्यास गेले व रघुनाथपंत यांचे पुत्र भास्करराव यांच्या नांवें प्रतिनिधींचीं वस्त्रें घेऊन मुतालीक नारो शंकर ठेविले. यामुळें भवानराव प्रतिनिधी मोंगलाकडे गेले व मोरो बाबूराव फडणीस व गोपाळराव गोविंद हेही गेले. नागपूरकर भोंसले मोंगलांस जाऊन भेटले. श्रीमंतांची स्वारी निघोन मिरजेस गेली. मोर्चे बसवून सत्ताविसावे दिवशीं मिरज घेतली. तों मोंगल लाखनवाड्याचा घांट चढून आले, व भोंसलेही उंबरीचा घांट चढून येतात, गोपाळराव वगैरे प्रतिनिधी सुद्धां फौजेचे जमावानिशीं येतात अशी खबर आली. तेव्हां श्रीमंत कूच करोन मल्हारजी होळकर बरोबर घेऊन गंगा उतरून औरंगाबाजेवरून कासारबारीनें मलकापुरास गेले. तेथील खंडणी साठ हजार रुपये घेतली. तों मोंगल गलीम सुद्धां घांट चढोन औरंगाबादेशीं येऊन पैठणावरून नागतव्यावर मुक्काम केला. श्रीमंतांचे स्वारीमागें मोंगलानें यावें तों फितुरामुळें मागें न येतां पुण्याकडे आला. श्रीमंतांनीं मागें यावें तरि मुलें लेकरें सांभाळावयास फौजेचे लोक जातील, फौज फुटेल, यास्तव पुण्याकडे न येतां उभयतां श्रीमंत ऐशीं हजार फौजेनिशीं तोफखाना मागें ठेऊन दरकूच भागानगरास गेले. कलम.

शके १६८५ सन ११७३ खांसे उभयतां भागानगरीं वैशाखमासीं दाखल जाहले. तेथें शहरास कुसूं लगत मुसानदी आहे. यामुळें शहरास हात न लागला. कारवानपुऱ्यापाशीं एक लक्ष ऐशी हजार रुपये खंडणी घेऊन कृष्णा व तुंगभद्रा संगमाकडे गेले. पुण्यांत मुतालकीवर नारो आपाजी होते त्यांचीं पत्रें आलीं कीं, मोंगल वगैरे पुण्याकडे आले, पुणें पळून गेलें, मातोश्री गोपिकाबाई व नारायणराव साहेब सिंहगडास गेले, रुमाल वगैरे संपत्ती गडास पाठविली. भोंसल्यांकडील करांडा वगैरे सरदार फौज घेऊन माची लुटली. पुण्यास आग दिली. सरकार [ वाडा ? ] खंडणी देऊन राखिला. कांहीं घरें शहरचीं जळालीं. कांहीं राहिलीं त्यांची याद पाठविली आहे. सिंह-

---

७९. हिवरें येथें जें एक टोलेजंग शिवालय सखाराम बापूंनीं बांधिलें तें याच सुमारास बांधिलें असावें. हल्लीं ह्या देवालयाची झाडलोटही नीट होत नाहीं ! देवळाच्या पोंवळीवरून भोंवतालचा देखावा फार रम्य दिसतो. गांवांतून देवळांत जाण्याकरितां मधील ओढ्याला दगडी धरण बांधिलें आहे.

८०. "सु० स० अर्बा तिस्सेन [म० अ० ११६४ इ० स० १७६३ ] खांसास्वारी भारथाड घ्यावयास गेली." दुसरी बखर.

गडावर मातोश्रींनीं कृष्णाजी हरि साठे यांची कन्या नोवरी निश्चय करून नारायण [ राव ] साहेब यांचें लग्न केलें. ही बातमी आली तेव्हां फौज सुद्धां देशीं येतात तों मोंगल व भोंसले यांणीं पुरंदरची खंडणी घेऊन राक्षसभुवन गंगातीरीं गेले. श्रीमंत आषाढ वद्य पक्षीं मादल [ ? ] मुगी घांटावर येऊन पोहोंचले. दुसरे दिवशीं श्रावण शुद्ध सप्तमीस प्रतिनिधी व मोरो बाबुराव यांचें राज्यकारण येऊन निराळे राहिले. मोंगल गंगापार गेला. दिवाण विठ्ठल सुंदर आईरतिरीं असतां सदाशिव रामचंद्र त्याजकडे होते. सरकार फौजेनिशीं श्रीमंत उभयतां चालून गेले. आघाडीस निळकंठ माहादेव व महिपतराव चिटणीस व महादजी शितोळे, माधवराव नरसिंह [ व ] हुजूर पागा व मोरो कोन्हेर व रंगो कोन्हेर व दादा पोतनीस होते. तों नबाबाचे दारूस व बाणांस आग लागून दारूखाना उडाला. त्या संधींत निळकंठ माहादेव यांजकडील फौजेनें तोंड लाविलें. श्रीमंत येऊन पोंचले. रघुनाथ बाजीराव यांचा हवदा येत होता. दरम्यान विठ्ठल सुंदर व विनायकदास व इस्मालखान पठाण पांच हजार फौजेनिशीं हौद्यावर उठोन हौदा माघारा फिरविला. मागें पुढें पठाणांची फौज चालली. सरकार फौजेचा मोड जाहला. ईश्वरी कौतुक! त्यांचेच लोकांत बार सुटून गोळी विठ्ठल सुंदर यांस लागली. लोक उभे राहिले. पुढें मल्हारजी होळकर होते त्यांची शिलिक जाहली. यामुळें विठ्ठल सुंदर सात अंबाऱ्या फौज सुद्धां उभा राहिला. श्रीमंत माधवराव बल्लाळ प्रधान घोड्यावर होते ते एकीकडे उभे राहून विठ्ठल सुंदर यांचे अंबाऱ्यावर आपले लोक पाठविले. तटाचें झुंज जाहलें. बाबूजी नाईक व दमाजी गाईकवाड श्रीमंतांस पाहत आले. तेव्हां श्रीमंतांजवळ महादजी शितोळे वगैरे लोक होते. तेव्हां शितोळे अंबारीवर जाऊन मारितों म्हणून बोलिले. वांचून आल्यास मांजरी गांव[८३] द्यावा ऐसें बोलून झुंजावर गेले. शितोळे यांनीं अंबारी घेतली. ते समयीं माधवराव नरसिंह यांस वीस जखमा लागल्या. नबाबांनीं गंगेपलीकडून तोफांचा मार केला. तीन प्रहर दिवस आला. अकरा कोस मजल चालून येऊन लढाई केली. त्यांत अभ्र येऊन पर्जन्य पडून अंधकार पडला. पठाणांनीं घोड्याच्या कुच्या मारोन भिजोन राहिले [ ? ] श्रीमंत खासे चालून

---

८१. शिलक=सरबत्ती.

८२. तटाचें=हटाचें, नेटाचें.

८३. मांजरीगांव सातारा जिल्ह्यांत आहे. शितोळे यांजकडे नीरथडीची देशमखी होती. यांचे वंशज ग्वालेरीस शिंद्यांचे पदरीं आहेत.

८४. माधवराव नरसिंह हे विंचूरकर असावे.

८५. ही लढाई मोठ्या शर्तीची झाली. हिचें वर्णन इतकें सविस्तर दुसरें कोठें आढळत नाहीं. पेशव्यांची बखर पृ० ८४ ते ८६ पहा.

येऊन पठाण लुटून घेतले. विनायकदास ठार पडून तीन कोस मुर्दे पडून रण जाहलें. विठ्ठल सुंदर यांस गोळी लागली होती. त्यांस अंबारींतून लोटून दिलें. तों गिलचे लोक यांणीं डोकी कापून भाल्यावर घातलें. सदाशिव रामचंद्र व शाबाजी सुपेकर गंगापार गेले. कितीएक बुडाले. सरकारची फत्ते झाली. विठ्ठल सुंदर यांचे अंबारींत बसून उभयतां श्रीमंत गौराई धोंडराईवर मुक्काम केला. पर्जन्य वाढला. गंगेस पूर आला. बावीस उमराव अंबारी सुद्धां पाडाव आले. पठाण वगैरे मराठी फौज तीस हजार बुडाली. नबाब यांनीं तोफा जाग्यावर टाकून निघोन गेले. दुसरे दिवशीं श्रीमंत गंगापार होऊन औरंगाबादेवर हल्ला केला. शहरांतून मार जाहला. शहरची खंडणी घेऊन मुक्कामास आले. महादजी शितोळे यांस रामबाण हत्ती व मांजरीगांव दहा हजार रुपयांचा दिल्हा. व दोनशें स्वारांची सरदारी दिल्ही. गोपाळराव गोविंद मोंगलाईंत गेले होते त्यांची मिरज त्यांस देऊन समजावी केली. श्रीमंत दादा साहेबांचे पुत्र भास्करराव यांचा काल जाहला. भवानराव प्रतिनिधी मोंगलाईंत गेले होते त्यांची समजूत करून प्रतिनिधी त्यांचे हवाली केली. फडणीशी चिंतो विठ्ठल करीत होते. मोरो बाबूराव फडणीस मोंगलाईंत गेले होते, त्यांची समजाविशी करून फडणीशीचीं वस्त्रें बाळाजी जनार्दन यांस दिलीं. भोंसले नागपूरकर यांचीं कामें कानें करून देऊन त्यांस निरोप दिला. मोरो विठ्ठल रायरीकर यांस शिद्यांची फडणिशी सांगितली चिंतो विठ्ठल रायरीकर यांस पालखी दिली. सदाशिव रामचंद्र गंगापार गेले. ते तिकडेसच असत. मोंगलाकडील बावीस उमराव पाडाव होते त्यांस वस्त्रें देऊन निरोप दिल्हा. मोंगल तोफा टाकून गेला होता त्या तोफा सरकारांत आणिल्या. श्रीमंत पुण्यांत वाड्यांत असतां रघुनाथ बाजीराव निघोन आनंदवल्लीस गंगातीरीं राहिले. पुरंदर किल्यास अम्मल निळकंठ महादेव यांचा होता, तेथें विसाजीपंत सोहनी यांनीं फितुर करून किल्ला घेऊन सरकारांत दिल्हा. ते समयीं कोळियांचा दंगा होऊन जेजुरीस कोन्हेर त्रिंबक यांचा वाडा लुटून निळकंठ महादेव यांचा काळ सासवडीं जाहला. त्यांस दत्तपुत्र नाना पुरंदरे यांचे पुत्र माधवराव जाहले. स्वांसे पंतप्रधान स्वारीस कर्नाटकांत गेले. पौषमासीं. कारभारी सखाराम भगवंत. श्रीमंतांचे वाड्याचे पूर्वेचे दरवाज्याजवळ

८६. हा नाना फडणीस यांचा उदयकाल. येथपासून ते राजकारभारांत पडले ते यावज्जीव [ १८०० पर्यंत ] तसेच होते.

८७. हे रायरीकर शनवारांतील ओंकारेश्वराजवळचे ?

८८. सदाशिव रामचंद्र हे रामचंद्रबावा शेणवी यांचे पुत्र असावे पण हे मोंगलाकडे कां व कधीं गेले तें स्पष्ट होत नाहीं.

बाबूराव फडणीस व जानभट शालग्राम [ यांचे ] वाडे जाहले होते ते जळाले. तेव्हांच रामचंद्र बावाचा वाडा सात मजली होता तो जळाला. कलम.

शके १६८६ सन[८९] ११७४. श्रीमंत स्वारीस कर्नाटकांत गेले होते त्यांनीं धारवाडास मोर्चे बसवून धमधमा बांधोन किल्ला जेर केला. रघुनाथ बाजीराव आनंदवल्लीस होते ते फौजे सुद्धां निघोन अनंतपुरास गेले. कारभारी चिंतो विठ्ठल. कलम.

शके १६८७ सन[९०] ११७५. श्रीमंतांनीं धारवाड घेऊन पुढे हैदर नाईक याजवर स्वारीस गेले. रघुनाथ बाजीराव आनंदवल्लीस गेले. कलम.

शके १६८८ सन[९१] ११७६. श्रीमंत यांनीं धारवाड घेतलें. तेव्हां नारो कोन्हेर यांस पालखी दिली. हैदरनाईकाकडील स्वारी करून सिंहस्थाचें साल याजकरितां गंगातीरीं जाऊन अखेरीस ज्येष्ठमासीं शके १६९० पुण्यांत दाखल जाहले. फाल्गुन मासीं कोन्हेर त्रिंबक मृत्यु पावले. रघुनाथ बाजीराव आनंदवल्लीहून स्वारी निघोन गुहागर पर्यंत जाऊन अखेरीस आनंदवल्लीस आले. कलम.

शके १६८९ सन[९२] ११७७. श्रीमंत पंतप्रधान श्रावणमासीं निघोन आनंदवल्लीस दादासाहेबांकडे जाऊन त्यांची समजी करून, जाहागीर देऊन, किल्ले सातारा वगैरे चिठ्ठ्या घेतल्या. विजया दशमीस रंगो कोन्हेर यांस तैनात करून देऊन पालखीचीं वस्त्रे दिलीं. कार्तिकमासीं निघोन पुण्यास आले. रघुनाथ बाजीराव यांणीं फौज मिळवून मल्हारजी होळकर यांचे कारभारी सामील करून धोडप किल्याजवळ पंचवीस हजार फौज जमा केली. वैशाख मासीं शके १६९० दत्तपुत्र अमृतराव भुसकुटे[९३] यांचे पुत्र घेतले. श्रीमंत

---

८९. "सु० स० खंमस [ तिस्सेन म० अ० ११६५ इ० स० १७६४ ] खांसा स्वारी धारवाड घेऊन पुढें कर्नाटकांत गेली. दादा साहेब आनंदवल्लीहून कर्नाटकांत गेले." दु० ब०.

९०. "सु० स० सीत तिस्सैन [ म० अ० ११६६ इ० स० १७६५ ] खांसा स्वारी कर्नाटकांतून येऊन वऱ्हाड प्रांतीं भोंसले यांजवर गेले. अखेरीस पुण्यास आले. दादा पुण्यास येऊन आनंदवल्लीस जाऊन तेथून हिंदुस्थानांत जातां खांसा स्वारीस मिळोन गोहदेस गेले. सन मजकुरीं खांसा स्वारींतून भवानराव यांजवर रामचंद्र गणेश गेले." दु० ब०.

९१. "सु० स० सब्बा तिस्सैन [ म० अ० ११६७ इ० स० १७६६ ] खांसा स्वारी कर्नाटकांत गेली. सिरे वगैरे ठाणीं घेऊन आले. दादा गोहदेस होते." दु० ब०.

९२. "सु० स० संमानतिस्सैन [ म० अ० ११६८ इ० स० १७६७ ] गोपाळराव कर्नाटकांत पाठविले ते अखेरीस आले. दादा अव्वलीस गोहदेहून आले ते आनंदवल्लीस होते. वैशाखमासीं फौज धरून धोडपेहून आणिले." दु० ब०.

९३. 'भुसकुटे' यांचे पूर्वज पापडी ऊर्फ चिमणपुरा वसई नजीक येथें होते. त्यांचे वंशज तेथें अद्यापि आहेत.

पंतप्रधान यांस दादा साहेबांकडील फौजेची व दत्तपुत्र घेतल्याची [खबर] कळली तेव्हां श्रीमंत ज्येष्ठमासीं स्वारी तयार करून घोडपेस गेले. मोकबला दोन्ही फौजेचा होतां कारभारी चिंतो विठ्ठल पाडव केले. त्यांचे बंधू मोरो विठ्ठल जखमा लागून खालीं आले. दादासाहेब घोडप किल्यावर गेले. फौज निघोन गेली. किल्ला वेढिला. तेव्हां दादासाहेब खालीं आले. त्यांस घेऊन सत्ताविसावे दिवशीं मोरो बाबूराव कारभारी यांस घेऊन सखाराम भगवंत यांसुद्धां पुण्यास आले. रामचंद्रबाबा यांचा वाडा सात मजली होता तो जळाला त्या जाग्यांत साठे व वामनभट शालिग्राम व देशपांडे यांस जागा दिल्या. त्यांनीं घरें बांधिलीं. कलम.

शके १६९० सनै ११७८. दादासाहेब यांसि वाड्यांत बंदोबस्तानें ठेऊन श्रीमंत स्वारीस निघाले. बराबर रामचंद्र गणेश व गोपाळ गोविंदै व शिंदे होळकर सुद्धां वराडांत स्वारी केली. जानोजी भोंसले मोठे फौजेनें चालून आले. सरकारफौजेचा दाब घेऊन पळ काढिला. मागें रामचंद्र गणेश व गोपाळराव गोविंद. त्यांचे मागें खांसे श्रीमंत पंचवीस कोसांचे मजली करून नागपूर लुटलें. देवगड चांद पावेतों मुलुकांत रँजीक केलें. खंडणी घेऊन तह जाहला. रामचंद्र गणेश व शिंदे होळकर हिंदुस्थानांत रवाना केले. श्रीमंत व विसाजी कृष्ण निघोन पुण्यास आले. कलम.

शके १६९१ सैन ११७९. खांसा स्वारी करनाटक प्रांतीं कारभारी मोरोबाबूराव बराबर नारायणरावसाहेब. जिजगल[?] किल्यावर हल्ला झाला, तेथें नारायणराव साहेब यांचे हातास गोळी लागली. किल्ला फते झाला. नंतर त्रिंबकराव मामा करनाटकांत छावणीस ठेऊन श्रीमंत पुण्यास आले. दादासाहेब वाड्यांत होते. कारभारी मोरो बाबुराव व सखाराम भगवंत. विसाजी कृष्ण व रामचंद्र गणेश व शिंदे होळकर हिंदुस्थानांत फत्तरगडावर आहेत. कलम.

शके १६९२ सैन ११८०. खांसा स्वारी निघोन तांदुळवाडी पावेतों गेली, शरीर अस्वस्थ झालें यामुळें आप्पा बळवंत यांजबरोबर फौज देऊन मामा क-

---

१४. "सु० स० तिस्सां तिस्सैन (म० अ० ११६९. इ० स० १७६८) रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण त्रिंबक वगैरे किल्ल्याचे बंदोबस्तास होते. तेथून आल्यावर हिंदुस्थानची रवानगी झाली. ते मागती खांसा स्वारींत येऊन वर्ष प्रतिपदेस हिंदुस्थानांत गेले."

१५. पटवर्धन.

१६. राजीक=नासाडी, धुळधाणी.

१७. "सु० स० सब्बैन (म० अ० ११७० इ० स० १७६९) त्रिंबकराव विश्वनाथ कर्नाटकांत." दु० ब०.

१८. "सु० स० इहिदे सब्बैन कृष्णराव बळवंत यांस मामाकडे रवाना करून पुण्यास आले." दु० ब० कृष्णराव बळवंत हेच आपा बळवंत. हे बळवंतराव गणपत मेहेंदळे पाणिपतच्या लढाईंत पडले त्यांचे चिरंजीव. भाऊ साहेबांची बखर, शेवट पहा.

डे करनाटकांत रवाना केले. खांसे पुण्यास आले–कारभारी मोरो बाबूराव. सखाराम भगवंत घरीं. दादासाहेब वाड्यांत. शिंदे होळकर विसाजी कृष्ण रामचंद्र गणेश हिंदुस्थानांत. त्रिंबकरावमामा करनाटकांत. कलम.

१ शके १६९३ सनं[99] ११८१. खांसे स्वारीस निघोन शरीरास विकृती झाली सबब घरास आले. नारायणराव पुण्याहून श्रीमंतां कडे गेले. रामचंद्र गणेश हिंदुस्थानांतून विसाजीकृष्ण याचें न बने म्हणोन निघोन आले. भेटी झाल्यावर सारे पुण्यास आले. अमृतराव याचें लग्न टोंक्यास जाहलें. शिंदे होळकर विसाजी कृष्ण फत्तरगडास. त्रिंबकराव मामा कर्नाटकांत. कलम.

शके १६९४ सनं[100] ११८२. खांशांचें शरीर अशक्त जाहलें सबब थेवरास श्रीगणपती* जवळ राहिले. दादा साहेब पुण्यांत वाड्यांत. करनाटकांतून त्रिंबकरावमामा स्वारी करून भाद्रपद मासीं आले. दादा साहेब वाड्यांत होते. त्यांस राम शास्त्री बावां सहित थेऊरास आणून स्नेहाच्या गोष्टी सांगून कार्तीक वद्य अष्टमी रोजीं श्रीमंतीं अवतार समाप्त केला. मोरो बाबूराव कारभारी घरीं ठेऊन सखाराम भगवंत कारभारास लाविले. नारायणराव साहेब सार्थक करावयास. संपूर्ण राजमंडळ सुद्धां थेऊरीं जमा झाले. नारायणराव बल्लाळ कारभारी सखाराम भगवंत. श्रीमंत कैलासवासी झाल्या नंतर स्वारी मार्गशीर्ष मासीं सातार्‍यास निघोन गेली. राजदर्शन झाल्यावर राजे यांणीं पेशवाईचीं वस्त्रें श्रीमंतांस व अष्टप्रधानांस चाली प्रमाणें वस्त्रें देऊन दिवाणगिरी व मुतालिकी वस्त्रें पुरंदरे यांस जाहलीं. नंतर सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन फडणीस व हरी बल्लाळ फडके व हुजूरचे दरकदार व रंगो कोन्हेर एकबोटे यांस वस्त्रें दिलीं. महाराजांचा निरोप घेऊन पंतप्रधान पुण्यास आले. दादासाहेब वाड्यांत असतां त्यांची कन्या सौभाग्यवती दुर्गाबाई पांडुरंगराव बारामतीकर यांस देऊन लग्न केलें. खांसे श्रीमंत, कारभारी सखारामपंत, स्वारीस निघोन गंगापुरीं गोपिकाबाई होतीं त्यांस भेटून पुण्यास आले. दादासाहेब यांचा बंदोबस्त केला. कलम १

---

९९. "सु० स० इसन्ने सब्बैन (म० अ० ११७२ इ० स० १७७१) खांसा स्वारी कटारे [कवरे ?] यास गेली. नगर वगैरे येथें जाऊन पुण्यास आली. नारायणराव यांची स्वारी निघोन कटारे यास गेली. पुढें खांसा स्वारी बराबर आली." दु० ब०.

१००. "सु० स० सल्लास (सब्बैन म० अ० ११७३ इ० स० १७७२) नारायणराव पुण्यास कारभारास." दु० ब०.

*अष्टसिद्धि विनायकांपैकीं थेऊर येथील एक.

## कारकीर्द नारायणराव बल्लाळ.

१ शके १६९५ सनं ११८३. कारकीर्द रघुनाथ बाजीराव व मातोश्री गंगाबाई सुद्धां.

१ पंतप्रधान नारायणरावबल्लाळ कारकीर्द, कारभारी सखाराम भगवंत, शके १६९४ मार्गशीर्ष मासीं वस्त्रें झालीं तागाईत फाल्गून अखेर शके अखेर. इस्तकबिल चैत्र शुद्ध १ शके १६९५ तागाईत भाद्रपद शुद्ध १४. खांसे वाड्यांत असतां पूर्वेचे खिडकी लहान असे ती मोठी करावया करितां भिंत पाडिली होती. दरवाजा लावावा तो मिति मजकुरीं स्वारी पर्वतीस जाऊन राघोजी आंग्रे सरखेल त्यांस भेटून वाड्यांत आले. तितक्यांत तिमयाबावाचे पुत्र बाबा गोसांवी संस्थान सहित वाड्यांत आले होते, त्यांचे पंक्तीस भोजन होणें आणि वर्तमान कळलें कीं गारदी दंगा मात करणार त्याचा बंदोबस्त हरी बल्लाळ यांस सांगितला. खांसे जेऊन महालांत गेले. तों सुमेरसिंग व महंमदइसफ सरदार तलबेचा हंगामा[2] वाड्याजवळ येऊन पडकी भिंतीकडून वाड्यावर चढले. खरकसिंग वाड्यांत होता. तो त्यांस मिळाला. गारदी महालांत शिरले. दिल्ली दरवाजा लावून घेतला. गोळ्या चालल्या. श्रीमंत महालांतून निघोन दादासाहेब होते त्यांजकडे गेले. सुमेरसिंग मागोमाग आला. तुळाजी पवार खिसमतगार त्यानें मागे ओढिला तों चाफाजी टिळेकर खिसमतगार येऊन पोहोंचला. त्याचे गळ्यास श्रीमंतांनीं मिठी घातली. सुमेरसिंग व तुळ्या पवार यानें तरवारिचे वार टाकून दोघेही ठार केले. दादासाहेब यांस खालीं आणून चांफेखणांत बसविलें. नारोजी नाईक जासूद आला त्यास ठार मारिलें. इच्छाराम पंत ढेरे वाड्यांत गेले त्यास दरवाज्या जवळ ठार मारिलें. गाई ठार मारिल्या. हरी बल्लाळ फडके वाड्यांत जावयास गेले तों दरवाजे बंद. तेव्हां फडके व सखारामपंत बुधवारचे चावडीस जाऊन बसले. लोक व फौजा तयार होऊन शहरांतील रस्ते धरिले. दादासाहेब यांचे चोबदार लोकांस बोलावयास आले. तेव्हां सखारामपंत यांस पुसावयास आले. त्यांणीं चिठी वाड्यांत पाठविली. तिचें उत्तर आलें. ती चिठी[3] घेऊन हरीपंत बारामतीस निघून गेले. सखारामपंत आपले घरास गेले. संध्याकाळ झाला. बजाबा पुरंदरे व मालोजी राजे घोरपडे वाड्यांत जाऊन आले. श्रीमंतांचा काळ झाला हे वर्तमान सर्वांस

---

१. "सु० स० अर्बा (सब्बैन म० अ० ११७४ इ० स० १७७३) सन सल्लास मार्गशीर्ष मासीं वस्त्रें झालीं. सन अर्बा भाद्रपद मासीं दंगा होऊन काळ झाला.

आश्विन मासीं विसाजी कृष्ण हिंदुस्थानांतून आले.

आश्विन मासीं वस्त्रें आणविलीं व खाशी स्वारी दसऱ्यास बेदराहून म (मु?) ल्हेर पावेतों गेली." डु० ब०.

२. हंगामा=आरडा ओरड, गर्दी.

३. ही चिठी व तिचें उत्तर यांत काय मजकूर होता तें कळत नाहीं.

समजलें. नंतर त्रिंबकराव मामा व सर्वत्र मिळोन श्रीमंतांचें शव पुलापाशीं नेऊन दहन केलें. भाद्रपद शुद्ध १४. दादासाहेब दुसरे दिवशीं पोशाक करून कचेरीस असतां सुमेरशिंग व महमद इसफ यांनीं तलबेचा दंगा करून तीन दिवस बसविलें. तेव्हां सखारामपंत यांनीं तलबेचा निकाल करून श्रीमंतांस मोकळें केलें. कारभार चालला. नंतर चिंतो विठ्ठल व आबाजी माहादेव, सदाशिव रामचंद्र मिळोन स्वारीस बाहेर निघोन, कार्तीक मासीं बजाबा पुरंदरे यांस साताऱ्यास पाठवून रामराजे यांचीं वस्त्रें आणिलीं. रघुनाथ बाजीराव शिक्का झाला. स्वारी बेदरास चालली. बरावर सखारामपंत व बाळाजी जनार्दन आहेत. विसाजी कृष्ण हिंदुस्थानांत होते ते फत्तरगड लुटून संपत्ती नेली होती ती जडजवाहीर वगैरे घेऊन लोकांचे फडशे करून जामदारखाना व हत्ती सुद्धां दादासाहेब यांस येऊन भेटले. बावीस लक्ष रुपये जवाहीर व जामदारखाना दादासाहेब यांणीं वाड्यांत ठेवून विसाजीपंत यांस बरावर घेऊन बेदरास गेले. नबाबाची भेट घेतली. ६५,००,००० पासष्ट लक्षांचा मुलुक माघारा देऊन पुढें गेले. सखारामपंत व बाळाजी जनार्दन निरोप घेऊन घरास आले. हरी बल्लाळ घरींच होते. पुण्यास मुतालकीवर नारो आप्पाजी होते. कर्नाटकांत स्वारी चालली. तेव्हां त्रिंबकरावमामा याबरावर बारा हजार फौज देऊन साबाजी भोंसले याजवर पाठविलें. श्रीमंत बल्लारी पर्यंत गेले. पौष अखेर पुण्यांत नारायणराव साहेब यांची स्त्री गंगाबाई गरोदर होती ती निघोन पुरंदरास गेली. सखारामपंत व बाळाजी जनार्दन पुरंदरास गेले. नारायण आप्पाजी मुतालकीस होते त्यांनीं बाईचे हुकुमावर केशवराव कोतवाल त्यास धरिलें. पुण्यांत द्वाही फिरवून हुकूम मातोश्रींचा झाला. दादासाहेब याजबरोबर लोक गेले होते त्यांच्या घरीं चौक्या बसविल्या. त्रिंबकरावमामा भोंसल्या कडे पाठविले होते त्यांनीं साबाजी भोंसले यास अनुकूळ करून कुमकेस आणिलें. हरी बल्लाळ यांस सखारामपंत व नाना फडणवीस यांनीं त्रिंबकरावमामा यांजकडे रवाना केलें. दक्षिणेस बेदा जाहला हें समजून दादासाहेब करनाटकांतून माघारे पंढरपुरास आले. तों त्रिंबकरावमामा चालोन कासेगांव गोपाळपुरावर आले. लढाई होऊन मामा चैत्रमासीं पाडाव गेले. हरी बल्लाळ फौजे सुद्धां निघोन निजामअल्लीस भेटले. कृष्णराव बल्लाळ यांचे विद्यमानें पासष्ट लक्षांची जहागिरि भाऊसाहेब यांनीं घेतली होती ती देऊन नबाबा सुद्धां चालून आले. दादासाहेब यांनीं दोन मुक्काम करून, कूच करून बऱ्हाणपुरास गेले.

---

४. पूल लकडी–मागें पृ० १९ टी० ७० पहा.

५. जो उदगीरच्या लढाईंत भाऊ साहेबांनीं मिळविला होता तो.

६. नारो अप्पाजी तुळशीबागवाले.

७. गंगाबाई.

८. पाडाव गेले=धरले गेले.

मामा जखमी होते त्यांचा काल चैत्रमासीं खडकतचे मुक्कामीं जाहला. हरी बल्लाळ नबाबाची फौज सुद्धां होती. तों अधिक वैशाख शुद्ध ७ शके १६९६ गंगाबाई प्रसूत झाली. पुत्र माधवराव झाले. दादासाहेब सातपुड्याचे डोंगर पार गेले. फौज माघारी येऊन हरी बल्लाळ यांस भेटले. बजाबा पुरंदरे व मुजुमदार व चिटणीस वगैरे निघोन पुरंदरीं श्रीमंतां जवळ आले. सखाराम भगवंत व नाना फडणीस यांस भेटले. कारकीर्द रघुनाथ बाजीराव महिने:—

८५ स्वारींत व मुक्कामीं शिक्का भाद्रपद तागाइत चैत्र अखेर शके १६९५ आठ महिने मुतालकी शिक्का चालला.

८४ पुरंदराहून मातोश्रीचा हुकूम माघ शुद्ध ५ तागायत अधीक वैशाख शुद्ध १४ शके १६९६.

---

## कारकीर्द माधवराव नारायण प्रधान.

१ शके १६९६. श्रीमंत व मातोश्री गंगाबाई व कारभारी सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन. किल्यावर राहून हुकूम चालवितात. त्रिंबकरावमामा व हरी बल्लाळ नबाबास घेऊन दादासाहेब यांचे मागें लाविले. दादासाहेब ब्रह्माणपुरावरून सातपुडा पार गेले. नबाबाची छावणी औरंगाबादेस झाली. हरी बल्लाळ खानदेश प्रांतींहून आले व श्रीमंतांस किल्यावर ठेवून सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन हे फौजे सुद्धां दादासाहेब यांची समजूत करावी म्हणून गेले. थाँलनेर घेतलें. नबाब येऊन भेटले. श्रीमंतांची समजी झाली नाहीं. तेव्हां त्यांस निरोप देऊन किल्यास दाखल झाले. थालनेर ब्रह्माणपूरची स्वारी खमस सबैनांत झाली. नारो आप्पाजी पुण्यांत कामावर त्यांस किल्यावरून आज्ञा येतांच गेले. दादासाहेब यांचे बरोबर लोक गेले होते त्यांचेघरीं चौक्या बसविल्या. लोक घरास आल्यावर हुकुमा प्रमाणें चौक्या उठवीत होते. मार्गशीर्ष मासीं इंग्रज कोंकणांत येऊन साष्टी किल्ला घेतला. त्याजवर विसाजी कृष्ण पाठविले. त्याजवर दादासाहेब सातपुड्याच्या डोंगरातून जातां जातां सौभाग्यवती आनंदीबाई गरोदर होतीं त्यांस मार्गींचे श्रम न सोसत सबब पवाराकडे धारेचे किल्यांत ठेवून आपण पुढें गेले. सौभाग्यवती आनंदीबाई पौष शुद्ध ६स संक्रांतीचे पूर्वीं प्रसूत होऊन पुत्र बाजीराव झाले. ती खबर किल्ले पुरंदरास आली. श्रीमंतीं वस्त्रे व इनाम दिल्हें. नारो आप्पाजी पुण्यांत होते त्यांचा काळ फाल्गुन शुद्ध ५ झाला.

---

९. "सु० स० खमससब्बैन (म० अ० ११७५ स० इ० १७७४.) खानदेशांतून हरी बल्लाळ गुजराथप्रांतीं. साष्टी मार्गशीर्ष मासीं गेली." दु० ब०.

१०. हें थालनेर 'तालनेर' असावें.

त्यांचे भाचे जनार्दन आप्पाजी कारभार करूं लागले, व त्याचा पुत्र तात्या किल्याचा कारभार करूं लागले. कलम.

१. शके १६९७ सन ११८५. खांसे व कारभारी किल्यावर. कोणास येणा जाणारास परवानगी लागत होती. होळकर व महादाजी शिंदे हिंदुस्थानांतून देशीं आले. हरी बल्लाळ फौजे सुद्धां दादासाहेब ज्या मार्गें गेले तेही तिकडेच गुजरात प्रांतीं आहेत. दादासाहेब सुरतेकडे आहेत. रामचंद्र गणेश फौजे सुद्धां तळेगांवावर होते तेथून करवीरीस पाठविले. कोन्हेरराव पटवर्धन यांस करनाटकांत रवाना केले. पुण्यांत जनार्दन आप्पाजी. कलम.

१ शके १६९८ सेन ११८७. खांसा श्रीमंत व कारभारी किल्ले पुरंदरीं होते. भाऊसाहेबांच्या नांवीं पूर्वीं तोतया आला होता. त्याची चौकसी करून, बेडी घालून, किल्ले रत्नागिरीचे सुभदार रामचंद्र नाईक परांजपे, त्यांचे स्वाधीन केलें. त्यांणीं त्यास काढून, लोक जमा करून, भाऊसाहेब म्हणून किल्ले घेतले. ही खबर किल्ले पुरंदरीं आली तेव्हां महादजी शिंदे यांसि हुकूम देऊन पाठविलें त्यांनीं जुन्नर किल्यास वेढा घातला. तो तेथून पळून कुलाब्यास गेला. तेथें राघोजी आंग्रे सरखेल यांनीं धरून शिंद्याचे हवालीं केला. शिंदे पुण्यास घेऊन आले. बाबूजी नाईक वगैरे लोकांस दाखवून खोटासा निश्चय करून, उंटावर बसवून, शहरांत फिरवून कुंभारवेशीबाहेर मेकसूं घालून मारला. मार्गशीर्ष शुद्ध ७ मंगळवारीं. हरी बल्लाळ गुजरात प्रांतींहून किल्ले पुरंदरीं आले. कर्जपट्टी लोकांवर घौतली. बाजीपंत आण्णा फौज देऊन कोंकणांत पाठविले होते ते शिंद्यांनीं धरले. ते निघून करवीराकडे शिरोळ कवठ्यावर रामचंद्र गणेश होते त्यांस मिळाले. कोन्हेरराव पटवर्धन करनाटकांत होते त्यांची आणि हैदरनाईकाची लढाई झाली. पांडुरंगराव पटवर्धन पाडाव गेले. फौज कर्नाटकांत आहे. भिवराव यशवंत पानसे याबराबर तोफखाना व फौज कोंकणांत किल्ले घेतले होते त्यांचे बंदोबस्तास पाठविलें. कलम.

---

११. ह्या गृहकलहाच्या वेळीं पेशव्यांच्या राज्यावर जे अनेक हल्ले करणारे उत्पन्न झाले त्यांपैकीं कोल्हापुरकर एक होत. दुसरे इंग्रज, हैदर, निजाम वगैरे.

१२. सु० स० सब्बांसब्बैन ( म० अ० ११७७ इ० स० १७७६ ) हरी बल्लाळ गुजराथेंतून आले. बाजी गोविंद तोतया. भीमराव पानसे कोंकणांत बंदोबस्तास. पांडुरंगराव स्वारीस कर्नाटकांत धरिले गेले. मोरो बाबूराव फाल्गुन अखेर कारभार करूं लागले. रामचंद्र गणेश कोरेगांवपर्यंत होते. " दु० ब०. पांडुरंगराव पटवर्धन यांस हैदरानें पिंजऱ्यांत घातलें होतें ! ! तेथेंच त्यांचा काळ झाला. मोरो बाबूराव हे मोरोपंत दादा फडणीस.

१३. ही कर्जपट्टी मोहिमेच्या खर्चाबद्दल असावी. मागें पृ. १३ टी. * पहा.

१ शके १६९९ सन ११८७. श्रीमंत व कारभारी पुरंदरीं व जनार्दन आप्पाजी पुण्यांत. हरी बल्लाळ फौज घेऊन कर्नाटकांत गेले. महादजी शिंदे करवीरावर रामचंद्र गणेश त्यास मिळाले. तुकोजी होळकर देशीं असतां मोरो बाबूराव यांणीं मसलत करून बजाबा पुरंदरे व माधवराव निळकंठ होळकरा बरोबर पुण्यास येऊन मातोश्री पार्वतीबाई यांजला घेऊन येरवडयावर राहिले. तेथून थेऊरावर गेले. तेथें पुरंदरींहून सखाराम भगवंत आले. फाल्गुन माशीं मोरो बाबूराव फौजे सुद्धां व होळकर सासवडास गेले. सखाराम भगवंत व नाना फडणीस नारायणा जवळ व माचीखालीं मोरोबानीं कारभार करावा म्हणों लागले. असे कांहीं दिवस गेल्यावर श्रीमंतांचा बंदोबस्त नाना व सखारामपंताचा होता. हरी बल्लाळ कर्नाटकांत होते त्यांसि बातमी कळली त्यावरून ते कर्नाटकांतून निघून माहादजी शिंदे ह्यांस करवीरीं भेटून बराबर घेऊन ज्येष्ठ अखेरीस दाखल जाहाले. सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन यांच्या भेटी झाल्या. फौज मोठी जमली. तेव्हां होळकर लुटावा तर सरदार मोठा यास्तव शिंद्यांनीं आपल्याकडे घेतलें. मोरो बाबूराव व बजाबा पुरंदरे कैद करून नगरास आषाढमासीं नेलें. बजाबास किल्यावर ठेविलें. शिंदे निरोप घेऊन जामगांवास गेले. रामचंद्र गणेश कोरेगांव पर्यंत जाऊन माघारे आले. पुण्यास कारभारी जनार्दन आप्पाजी. माहदजी शिंदे यांणीं बऱ्हाणपूर शहर व अशेर किल्ला व जहागिर श्रीमंतां जवळून घेतली. कारभारी बाळाजी जनार्दन आणि सखाराम भगवंत कैद[१६] करून आपण शिंदे हिंदुस्थानांत गेले. कलम.

१ शके १७०० सन ११८८. श्रीमंत[व] कारभारी पुरंदरीं होते. दादासाहेब यांनीं इंग्रज बरोबर घेऊन बोरघाटास आले. तेव्हां महादजी शिंदे जामगांवींहून घाटतोंडीं आले. नाना फडणवीस व सखारामपंत हे फौजेसुद्धां आले. इंग्रजांचे विद्यमानें दादासाहेब शिंद्यांकडे आले. हरीबावा त्यांजबरोबर देऊन हिंदुस्थानांत लाविलें. इंग्रेज निघून गेले. शिंदे रहिमतपुरास गेले. तेथें शिंद्यांची कन्या बाळाबाई लाडोजी नरशिंगराव देशमूख यांस देऊन लग्न केलें. सखाराम भगवंत फाल्गुन मासीं वांईस गेले. त्यांनीं आपली कन्या सचीवाचे पुत्रास देऊन लग्न केलें. नाना फडणवीस किल्यावर होते. शिंदे लग्न करून किल्यास आले. सखाराम भगवंतही आले. श्रीमंतांची स्वारी

---

१४. "सु० स० तिस्सा सब्बैन (म० अ० ११७८ इ० स० १७७७). वैशाखमासीं स्वारी पुरंदराहून पुण्यास मुंजीकरितां आली." दु० ब०.

१५. नारायण कोण ? सवाई माधवरावास असें म्हटलें काय ?

१६. 'कैद' ह्याबद्दल 'कायम' असें असावें.

किल्याखालीं डेऱ्यास आली. कचेरी केली. तेथें सखाराम भगवंत कैद करून सिंहगडास पाठविलें. तेथून प्रतापगडास गेले. नंतर शिंदे निघोन जामगांवास गेले. शके मजकूरीं रामराजे यांनीं दत्तपुत्र वावीकर भोंसले यांचा घेऊन अवतार समाप्त केला. त्यांचें नांव शाहू राजे ठेविलें. चैत्रमासापासून नवी मुद्रा झाली. कलम.

१ शके १७०१ श्रीमंत पुरंदरींहून उतरून पुण्यास यावयाकरितां जेजुरीस आले. इंग्रेजांचा वकील पुण्यास आला. त्यास राहण्यास जागा मुळामुठा संगमीं दिली. श्रीमंत फौजसुद्धां चैत्र शुद्ध १ प्रतिपदेस पुण्यास वाड्यांत दाखल झाले. शिंदेही पुण्यांत आले. सरकारचे डेरे गारपिरावर उभे केले. श्रीमंतांची मुंज पर्वतीवर झाली. समारंभ मोठा केला. शिंदे वगैरे मुंजीस होते. मुंज झाल्यावर स्वांसे वाड्यांत दाखल. शिंदे हिंदुस्थानांत रवाना केले. डेरे अखेर सालीं वाड्यांत आणिले. चिंतो विठ्ठल शिंद्यांनीं बरोबर नेले व बाजी गोविंद जोशी स्वारीस कोंकणांत. कलम.

१ शके १७०२ सन ११९० श्रीमंत पुण्यांत वाड्यांत होते. इंग्रज आला म्हणून स्वारी पुरंदरास किल्यावर गेली. हरी बल्लाळ फौजेसुद्धां इंग्रजांवर कोंकणांत गेले. नाना फडणवीस फौज घेऊन पुनवळ्यावर जाऊन राहिले. घांटाचे तोंडीं बंदोबस्त केला. पुणें पळालें. इंग्रेज पुढें आल्यावर पुण्यास आग द्यावी ही ताकीद भास्करपंत कानिटकर यांजबरोबर जनार्दन आप्पाजीस पाठविली. परंतु आगीचा प्रसंग पडला नाहीं. इंग्रज गेले. हरी बल्लाळ खालीं कोंकणांत. बाळाजी जनार्दन वरघांटीं. इंग्रेज शिकस्त होऊन गेले. श्रीमंत पुरंदरींहून पुण्यास आले. बाळाजी जनार्दन व हरी बल्लाळ येऊन भेटले. गणेशपंत [18] भोरे [?] कोंकणांत ठेविले होते ते गुजरात प्रांतींहून आले. रामचंद्र गणेश कोंकणांत शांत झाले. त्यांचे पुत्र माधवराव रामचंद्र व बाजी गोविंद गुजरात प्रांतीं गेले. ते अखेरीस आले. कर्जपट्टी लोकांवर घेतली. शिंद्यानीं चिंतो विठ्ठल यांस नेले होतें ते आणून किल्यावर कैद केले. ते मेले. सखाराम भगवंत रायरीकिल्यावर शांत झाले. नारायणराव साहेब यांजवर ज्यांणीं हात टाकिला त्यांचीं पारपत्यें होत आलीं. महमद इसफ व सुमेरशिंग व खरकशिंग व तुळाजी पवार वगैरे जे सांपडले ते मारिले. बजाबा पुरंदरे द्रव्य घेऊन सोडिले. मुजुमदारीवर आबा मुजुमदार केले. त्याचें घर जप्त केलें होतें.

---

१७. सखाराम बापूचें स्वदस्तुरचें फितुरी पत्र नानांच्या हातीं लागलें होतें. पेशव्यांची बखर पृ० १३१ पहा.

१८. "गणेश विश्वनाथ बेहरे पुढें गणेशपंत खानदेशांत गेले." दु० ब०.

१९. वर पृ० ३० टी० १३ पहा.

मुजुमदारी चिंतामण दीक्षितास सांगितली होती. ती पुन्हा त्यांस दत्त नारो निळकंठ देऊन नजर घेऊन मुजुमदारी बहाल केली. कलम.

१ शके १७०३ सन ११९१. श्रीमंत वाड्यांत घोडीं फेरून बाळाजी जनार्दन आल्यावर कचेरी होऊन लोकांचे मुजरे घेऊन लोकांशीं बोलून ओळख धरूं लागले. चिंतो विठ्ठल किल्यावर मृत पावले. गणेश विश्वनाथ बेहेरे खानदेशांत पाठविले. महादजी शिंदे हिंदुस्थानांत. तुकोजी होळकर देशीं आहेत. बजाबा पुरंदरे मृतपावले त्यांस दत्त दिला. दुसऱ्यानें इंग्रज आला. नाना फडणीस व हरी बल्लाळ कोंकणांत उतरले. बेहेरे पोहोंचले. इंग्रज गेला. कलम.

१ शके १७०४ सन ११९२. श्रीमंतांचें लग्न. बाळाभाऊ यांची बहीण नवरी निश्चय करून नानाफडणीस यांनीं मोठा समारंभ करून पुण्यांत वाड्यांत लग्न केलें. गणेशपंत बेहेरे, मोगलांचे मदतीस निर्मळास धौशीं[20] बेबदल जाहला होता त्याचे पारिपत्यास, फौज सुद्धां पाठविले. दादासाहेब सुरतेस इंग्रजा जवळ. शिंदे हिंदुस्थानांत. कलम.

१ शके १७०५ सन ११९३. श्रीमंत व कारभारी नाना फडणीस व हरी बल्लाळ पुण्याचे मुक्कामीं आहेत. दादासाहेब व स्त्री सौभाग्यवती आनंदी बाई व दत्तपुत्र अमृतराव व दुसरे पुत्र बाजीरावांसहित इंग्रजा जवळ निघोन सुरतेहून गंगातीरास कचेश्वरीं आले. तेथील बंदोबस्त करून मार्गशीर्ष वद्य ३ येस काळ झाले.[21] तेव्हां आणंदी बाई गरोदर होतीं त्यांस चैत्र शुद्ध ९मीस पुत्र चिमाजी आप्पा झाले. कलम.

१ शके १७०६ सन ११९४. चैत्र-मासीं नाना फडणीस व हरी बल्लाळ सरकारी कारखाने बरोबर घेऊन फौजेसहित येदगिरीस गेले. तेथें नबाब निजाम अल्लीखान बाहादूर यांच्या भेटी झाल्या. ज्येष्ठ अखेरीस पुण्यास दाखल. तुकोजी होळकर बरोबर होते. महादजी शिंदे हिंदुस्थानांत. भाऊसाहेब यांची स्त्री पार्वती बाई यांचा काळ झाला. व जनार्दनबावाची स्त्री सगुणा बाईचा काळ झाला. कलम.

१ शके १७०७ सन ११९५. खासास्वारी नाना फडणीस व हरी बल्लाळ सुद्धां गंगापुरास जाऊन आले. मोरो बापूजी फडके[22] काशीस गेले. कार्तीक वद्य ४र्थीस. श्रीमंत बाजीराव व चिमाजी आप्पा व अमृतराव व मातोश्री

---

२०. धौशा, धोशा नांवाचा जहागीरदार.

२१. दादांचा काळ झाला तेव्हां बाईनें इतकी खबरदारी केली म्हणून सांगतात कीं, कांहीं महिने पर्यंत पुण्यास ती खबरही पोंचली नाहीं !

२२. हे कोण ?

आणंदी बाई कचेश्वरीं आहेत. त्यांचे जवळ गोविंदपंत गडबोले आहेत. विसाजीपंत आठवले यांनीं तेथलि पाहणी करून धोंडोपंतांनीं कैद करून किल्यावर* पाठविलें. कलम.

१ शके १७०८ सन ११९६. श्रीमंत पुण्यांत बाळाजी जनार्दन कारभारास. हरी बल्लाळ करनाटकांत छावणीस होते ते अखेरीस पुण्यास आले. कलम.

१ शके १७०९ सन ११९७. हरी बल्लाळ गंगापुरीस[२३] जाऊन आले. शिंदे हिंदुस्थानांत. नाना फडणीस पुण्यांत. होळकर देशीं. कलम.

१ शके १७१० सन ११९८. श्रीमंत व नाना व हरी बल्लाळ पुणें मुक्कामीं. होळकर देशीं आहेत. इंग्रज जागा मागूं लागले. त्यांस जागा दिली नाहीं. वकील ह्मणून राहिले. त्यांस जागा मुळा मुठा-संगमीं चिमट्यांत दिली. तेथें सैदानीचा दरगा होता. इंग्रजांची वस्ती ते दिवसापासून झाली. शिंदे हिंदुस्थानांत. कलम.

१ शके १७११ सन ११९९. खासा व नाना फडणीस पुण्यांत. श्रीमंतांची स्त्री सौभाग्यवती रमाबाईस रजोदर्शन झालें. गर्भाधान केलें. लोकांनीं नजरा केल्या. आश्विनमासीं रामशास्त्री बावा न्यायाधीशांचा काळ झाला. श्रीमंतांची स्वारी सिंहस्था करितां नासिक त्रिंबकेश्वरीं जाऊन आली. बरोबर नाना फडणीस गेले होते. बाजीराव, चिमाजी आप्पा व अमृतराव कचेश्वरीं. कारभारास गोविंदपंत गडबोले. शिंदे हिंदुस्थानांत. तुकोजी होळकर हिंदुस्थानांत रवाना केले. अली बहादर यांस सरदारी देऊन हिंदुस्थानांत रवाना केले. कलम.

१ शके १७१२ सन १२००. खासा श्रीमंत वाड्यांत. कारभारी नाना फडणीस. इंग्रजांसीं व टिपू सुलतान याशीं विरुद्ध झालें. त्याजवर इंग्रज चालून जावया करितां श्रीमंतांशीं राजकारण करून कुमक मागितली. श्रीमंतांनीं परशराम रामचंद्र यांस वस्त्रें देऊन पट्टणावर इंग्रजांचे मदतीस रवाना केलें. इंग्रज मोठे सामानानें पट्टणावर गेले. कार्तिक-मासीं हरी बल्लाळ, हुजुरात व नागपुरकर भोंसले व हुजूरचे कारखाने बरोबर घेऊन स्वारीस निघोन निजामअलीखान यांस भेटून पट्टणावर गेले. नबाबाची फौज इंग्रजाचे मदतीस गेली. शिंदे, होळकर, अली बहादर हिंदुस्थानांत. बाजीराव साहेब व चिमाजी आप्पा व अमृतराव साहेब मातोश्री सुद्धां कचेश्वरीं तेथील बंदोबस्तास गोविंदराव गडबोले व आप्पाजीराम सहस्त्रबुद्धे व केसोपंत वगैरे फौज पागा सुद्धां आहे. कलम.

---

* ह्याचा अर्थ स्पष्ट होत नाहीं. कैद कोणास केलें ?

२३. गंगापुरास श्री० गोपिकाबाई साहेब होतीं.

१ शके १७१३ सन १२०१. खासे श्रीमंत, बराबर नाना, फौजे सुद्धां स्वारी निघोन बांईस कृष्णातीरास कन्यागतीं गेली. तेथून साताऱ्यास जाऊन राजदर्शन घेतलें. वस्त्रें घेऊन स्वामींचा निरोप झाला. पुण्यास आले. हरी बल्लाळ व परशराम रामचंद्र व नबाबाची फौज व इंग्रज फौजेनिशीं टिपू सुलतान यांशीं लढाई करून छावणीस राहिले. घाशीराम कोतवाल कनूजा ब्राह्मण होता त्यानें एकवीस ब्राह्मण लिदीचे खोलींत लीद पसरून हाल करून कोंडून मारिले. हा बोभाट श्रीमंतांस कळला. ब्राह्मणांचा आग्रह धरून त्याचे पांच पाट काढून, शेंदूर घालून, उंटावर बसवून शहरांत फिरवून गारपिरावर नेऊन मारिला. भाद्रपद वद्य प्रतिपदा. त्यानें गारपिरापुढें भवानीपेठ सुमारें तलावाचा बाग केला होता.* शिंदे व होळकर व अल्ली बहादूर हिंदुस्थानांत. दादासाहेब यांची मंडळी कचेश्वरीं. कलम.

१ शके १७१४ सन १२०२. खासे श्रीमंत अठरा वर्षांचे उमरीचे झाले. श्री [स्त्री?] रमाबाई थत्ते यांची कन्या माघ वद्य ४ थीस शांत झाली. महादजी शिंदे हिंदुस्थानांतून मोठे फौजेनिशीं तोफखाना व कंपू चाळीस हजार जमात घेऊन पातशाही वस्त्रे व नालखी बरोबर घेऊन श्रीमंतांस मरताब पातशाही घेऊन पुण्यास ज्येष्ठमासीं आले. हरी बल्लाळ व परशराम रामचंद्र व नबाबाची फौज व इंग्रज व भोंसले पट्टणावर छावणी करोन टिपूसुलतान यांशीं लढाई करून शिकस्त केला. हरी बल्लाळ यांनीं सल्ला करून, तीन कोट रुपयांची दौलत करार खंडणी करून, नबाब, इंग्रज व श्रीमंत मिळून तीन वांटे करून, एक हिस्सा वांटणी श्रीमंतांस घेऊन, हरी बल्लाळ कूच दरकूच करून, शिंदे देशीं आले हें ऐकून पुण्यास दाखल झाले. हरी बल्लाळ यांच्या व शिंदे यांच्या भेटी होऊन फर्माणें[२४] बहुत डेरे उभे करून पातशाही वस्त्रें श्रीमंतीं घेतलीं. मर्तब पारसानिसांनीं वाचिला. नंतर नालखींत बसोन माहीमर्तब[२५] सुद्धां श्रीमंत वाड्यांत आषाढ शुद्ध ३ या २ प्रहरा नंतर दाखल झाले. माघ-मासीं स्त्रीचा काल झाला म्हणोन दुसरें लग्न फाल्गुन-मासीं केलें. दुष्काळ एक पायलीची धारण[२६] झाली. माणसें मेलीं. निजाम अल्लीखान भागानगराहून निघोन बेदरास येऊन छावणी केली. होळकर व अल्ली बहादर हिंदुस्थानांत आहेत. रघुनाथ बाजीराव यांचे पुत्र मातोश्रीसुद्धां आनंदवल्लीस जाण्यास विचार

---

* हा तलाव अद्यापि प्रसिद्ध आहे.

२४. 'फर्मानं राजपत्रकम्' रा० व्य० को०.

२५. माहीमर्तब-एक मत्स्य, दोन मुखवटे, दोन अफ्तागीर, वगैरे राजचिन्हें. हीं स्वारीचे वेळीं हत्तीवर न्यावयाचीं. "माहीदारस्तु मकरध्वजी" रा० व्य० को०.

२६. असा दुष्काळ पुढें सन इ० १८०३।४ या सालींही पडला होता. त्याचें वर्णन "माधव ग्रंथ" यांत दिलें आहे.

करितात ह्मणोन ऐकिलें. महादजी शिंदे यांनीं शिमग्याचा गुलाल गल्लोगल्लीं हत्तीवर बसोन श्रीमंतांवर रास खेळले. गुलाल फार उधळला. रस्त्यानें गुलाल लोकांनीं बहुत जमा केला. श्रीमंतांस आनंद होऊन खुषमर्जी होऊन शिंदे यास बहुत बक्षिस दिलें.[२७] कलम.

१ शके १७१५ सन १२०३. खासे श्रीमंत वाड्यांत. कारभारी नाना फडणीस. अमृतराव साहेब व बाजीराव व चिमाजी आप्पा व मातोश्री आनंदीबाई कचेश्वरीं होते. ते आनंदवल्लीस गेले. आनंदीबाईचा काळ झाला. फाल्गुन वद्य ११. सार्थक चांगलें केलें. कारभारास गोविंदपंत गडबोले. महादजी शिंदे वानवडीवर राहिले. स्वारी शिकारीस श्रीमंतास बराबर घेऊन करीत होते. नंतर माहादजी शिंदे यांचा माघ शुद्ध १२ बुधवारीं वाखा झाला. श्रीमंत परामृषास[२८] जाऊन आले. नंतर काळ झाला. त्यास पुत्र नाहीं. दौलतराव शिंदे भावाचा नातू होता. ते तुळजापुरास गेले होते. आबा चिटणीस वगैरे कारभारी यांनीं फौजेचा बंदोबस्त करून सार्थक केलें. वानवडीचे वोट्यावर छत्री बांधावयास काम लाविलें. दौलतराव तुळजापुराहून तिसरे दिवशीं दाखल झाले. क्रिया त्यांनीं केली. माहादजी बावा मृत्युपावल्यावर सरदारीचीं वस्त्रें दौलतराव यास देऊन पातशाही नालखी बाहाल केली. अली बहादर हिंदुस्थानांत आहेत. शिंदे व होळकर उभयतांत व्यत्यय आला. हिंदुस्थानांत लढाई झाली. होळकर शिकस्त झाला. ही खबर श्रीमंतांस आली. कलम.

१ शके १७१६ सन १२०४. खासे श्रीमंत वाड्यांत. कारभारी नाना.व हरी बल्लाळ यांचे शरीरास समाधान नाहीं सबब सिद्धटेकीं गेले. तेथें श्रीगणपती सांन्निद्ध ज्येष्ठ वद्य ७ देहविसर्जन झालें. पुत्र दाजीबा व बाबा व माधवराव जवळ होते. त्यांनीं सार्थक केलें. तुकोजी होळकर हिंदुस्थानांत जाऊन फौज सुद्धां आणविले. निजाम अल्लीखा बाहादुर वेदरीं छावणीस राहिले होते ते मोठी फौज घेऊन मशरील मुलूक कारभारी सुद्धां घेऊन चालून आले. तेव्हां श्रीमंतीं डेरे गारापिरावर उभे करून मुहूर्तानें बाळाजी जनार्दन दाखल जहाले. नंतर मागाहून खासा श्रीमंत मुहूर्त पाहून डेऱ्यास गेले. दौलतराव शिंदे व तुकोजी होळकर व भोंसले नागपूरकर व बाबा फडके हुजुरात लोक घेऊन स्वारीस लाख फौज जमा करून नागतव्यावर गेले. तेथें शिंद्याकडील जिउबादा-

२७. या रंग समारंभाचें व वरील माहीमरातब देण्याच्या समारंभाचें वर्णन "पेशव्यांच्या बखरींत" सविस्तर आहे. पृ० १६९ ते १७१ पहा.

२८. या वेळीं माधवरावास फार दुःख झालें असें सांगतात.

२९. पेशव्यांची बखर पृ० ५३ येथें दिलेली वंशावळ पहा.

दा हिंदुस्थानांतून मोठे फौजेनिशीं तोफखाना व कंपू फिरंगी घेऊन तीस हजारानिशीं शिंद्यास येऊन भेटले. लढाईची कवाईत श्रीमंतांस दाखविली. तों फाल्गुन शुद्ध ६ स नबाब निजाम अल्लीखां तोफखाना फौज सुद्धां मोहोरीचा घांट उतरून आला. श्रीमंतांच्या फौजा होळकर, शिंदे व हुजुरात खांशी पुढें होती. गांठ पडली. तों निजाम अल्लीखां शिकस्त करून खरडयावर घालविला. बुणगे बहुत लुटले. खरडयांत कोंडल्यावर सरकारच्या फौजा त्या भोंवत्या राहिल्या. जिउबादादा शिंद्यांकडील त्यांनीं तोफांचें कडें घालून वेढा घातला. शेरभर पाणी रुपयाचें जाहलें. तेव्हां मशरील मुलखास पाठवून भाऊसाहेबीं जहागीर घेतली होती त्यापैकीं पुन्हां माघारी दौलताबाद किल्ल्यांसुद्धां देऊन, मशरील मुलुक श्रीमंतांच्या हवालीं करून, सल्ला करून आपण कूच करून भागानगरास गेले. श्रीमंत स्वारीस गेले त्या वेळेस दादासाहेबांची मंडळी आनंदवल्लीस होती ती जुनरास आणून ठेविली. अल्ली बहादर हिंदुस्थानांत. कलम.

१ शके १७१७ सन १२०५. श्रीमंत यांनीं निजाम अल्लीखां शिकस्त झाल्यावर दौलतराव शिंदे यांस जामगांवास जावयास निरोप दिला. शिंद्याकडील जिऊबादादा व बाळोबा पागनीस वगैरे पुण्यास आले. मशरील मुलुक आणिला त्यास बंगल्याचे बागेंत ठेविलें. होळकर आले. वैशाखमासीं वाडयांत स्वारी दाखल जाली. कारभारी नानाफडणीस. वैशाख वद्य ३० सेस आप्पा शास्त्री समर्थ ब्राम्हण होते त्यांनीं कोणास न सांगतां नदीपलीकडे जाऊन सिद्धेश्वराचे देवालयास सन्यासग्रहण घेतलें. आणि गेले. अल्ली बाहादर हिंदुस्थानांत आहेत. श्रीमंत वाडयांत. जुनरास अमृतराव व बाबा[३१] साहेब व आप्पासाहेबाजवळ कारभारी गोविंदपंत गडबोले. श्रीमंत माधवराव नारायण पंत प्रधान जै स या हून स्वारीहून आल्यावर रमण्यांत जाऊन घोडीं फेरूं लागले व हत्तीच्या वगैरे लढाया लावूं लागले व भाले बोथाटया खेळून हरणामागें शिकारीस जात होते. स्वस्तिक्षेम राज्य चाललें. कारभारी नाना यांनीं नवी पेंठ वसवून तिचें नांव [३२]हणमंत पेंठ ठेविलें. विजयादशमीस मोठा उत्साह करून आल्यानंतर आश्विन शुद्ध १२ स नाची दिवाणखान्यांत असतां अकस्मात मेघडंबरी बंगल्याचे पायरीवरून कारंज्याचे नळीवरून खालीं पडले. मांडीस जखम लागून मांडी मोडली. तेव्हां बाळाजी जनार्दन धांवून आले. तबिबदार बलावून जखमा बांधिल्या. परंतु जखम मोठी. हैराण बहुत जहाले. कोजागरीच्या दिवशीं प्रकृत सावध अ-

---

३०. नरायणरावाचा काळ झाल्यावर हा मुलुख निजामाकडे परत गेला होता. मागें पृ० २८ पहा.

३१. बाबा साहेब=बाजीराव.

३२. हिचें 'हणमंत पेंठ' हें नांव न चालतां हल्लीं 'नानाची पेंठ' असेंच हिला म्हणतात.

सतां कारभारी यांस बोलावून म्हणों लागले कीं आपले शरीराचा भरंवसा नाहीं. दादासाहेबाचे पुत्र जुन्नरीं आहेत त्यांस आणावें. तों सायंकाळीं आश्विन शुद्ध १४ स अवतार समाप्त झाला. नानाफडणीस यांणीं सर्व वाड्यांतील बंदोबस्त करून, शहराची नाकेबंदी करून, संपूर्ण मुत्सद्दी व सरदार सुद्धां ओंकारेश्वराजवळ गेले तेथें सार्थक झालें.३३ श्रीमंतांचा काळ आरसेमहालांत झाला. आश्विन वद्य १२ शी पासून विद्यमान बाळाजी जनार्दन लागून कारभार चालला. शिक्का श्रीमंतांचा चालत होता. दत्तपुत्र घ्यावयाकरितां मूल पाहूं लागले तों दौलतराव शिंदे यांजकडील बाळोबा पागनीस व जिऊबा दादा यांचें बोलणें पडलें कीं, दत्त न करितां दादासाहेब यांचे पुत्र जुन्नरीं आहेत त्यांतील एक आणावा. नंतर बाळोबा व जिऊबादादा निघोन जामगांवास गेले. दौलतराव शिंदे फौज सुद्धां निघोन हिंदुस्थानांत चालले. जिऊबा दादांची भेट जामगांवीं झाली. नंतर त्यांस ताप येऊन एका दिवसांत जामगांवीं काळ झाला. शिंदे गंगातीरास गेले. मोठी फौज जमा करून जुन्नरास जाणार ही बातमी आली. नंतर बाळाजी जनार्दन यांणीं परशराम रामचंद्र पटवर्धन यांस माघ शुद्ध ९ मीस जुन्नरास पाठविलें कीं तिघांतून एकास घेऊन यावें. त्यावरून अमृतराव यांस तेथें ठवून बाजीराव व चिमाजी आप्पा यांस छ. १५ साबानीं जुन्नराहून घेऊन दापोडीजवळ माघ वद्यपक्षीं आले. तेथें बाळाजी जनार्दन यांची भेट झाली. १८ दिवस नित्य जात होते. तों फाल्गुन शुद्ध प्रतिपदेस पुणतांबें येथून कूच करून मोठे फौजेनिशीं पुण्यास शिंदे येतात म्हणोन ऐकिलें. त्यावरून बाळाजी जनार्दन यांणीं श्रीमंतांचा निरोप मागून फाल्गुनी १५ मेस निघोन किल्ले पुरंदरीं गेले. तेथून दुसरे दिवशीं निघोन गेले. दौलतराव शिंदे व बाळोबा पागनीस कारभारी येऊन श्रीमंतांस फाल्गुन शुद्ध १२ स भेटले. श्रीमंतांजवळ परशराम रामचंद्र होते. भेटी जहाल्या. त्या वेळेस दवलतराव शिंदे यांस श्रीमंतांनीं आपले गळ्यांतील मोत्यांची कंठी दिली. भेटी झाल्यावर उभयतां श्रीमंत व परशराम रामचंद्र यांस फाल्गुन वद्य पंचमीस शिंद्यानीं वाड्यांत नेलें. श्रीमंत बाजीराव साहेब मसनदीचे गादीस वंदन करून वर बसले. लोकांस आपले हातानें विडे दिले. नजरा करावयास लोक लागले, त्यांस मना केलें. दोन दिवस वाड्यांत राहून निशाण व श्रीमंत माधवराव साहेब यांची शिक्केकटार घेऊन फाल्गुन वद्य ७स गारपिरावर डेऱ्यास दाखल झाले. नंतर कूच करून परशराम

३३. नारायणराव यांचें सार्थक लकडीपुलापाशीं झालें असें वर गेलें आहे. त्या कालापासून तों माधवरावाचे मरणापर्यंत जो काल गेला त्यांत 'ओंकारेश्वरा' जवळच्या जागेंत हा संस्कार होऊं लागला. किंवा माधवरावाचाच हा संस्कार येथील प्रथमचा होय ?

रामचंद्र व शिंदे व होळकर व हुजुरात व बाबा फडके घेऊन येऊरावर जाऊन मुक्काम केला. बाळाजी जनार्दन साताऱ्यास राहिले. साताऱ्याहून कामकाज त्यांचे विद्यमानें चालत आहे. आश्विन शुद्ध १५ तागाईत फाल्गुन १५ पावेतों पांच महिने कारभार केला. नंतर परशराम रामचंद्र कारभार करूं लागले. माधवराव नारायण प्रधान यांची स्त्री यशोदाबाई वाड्यांत आहे. त्यांस रजोदर्शन जालें नाहीं. पहिली थत्ते यांची कन्या त्यांस रजोदर्शन होऊन पेशजींच काळ जाहाला होता. कलम.

येणें प्रमाणें इस्तकबील बाळाजी विश्वनाथ तागाईत श्रीमंत माधवराव नारायण पंत प्रधान पावेतों पेशवाई केली.[३४] त्यांत शाहूराजे शुक्ल संवत्सरीं शांत झाले. तेथपर्यंत बाळाजी बाजीराव प्रधान यांनीं सेवकत्वें करून चालून पराक्रमानें मुलुक काबीज करून पुण्याची वस्ती वाढाविली. नंतर श्रीमंत माधवराव नारायण याज पावेतों.[३५] * * *

[ दुसऱ्या बखरींत आणखी कांहीं वर्षांची हकीकत आहे ती. ]

१ सन सीत तिसैन[३६]. श्रीमंत खासा पुण्यांत असतां आश्वीन मासीं पौर्णिमेस काळ झाला. बाजीराव व चिमाजी आप्पा आनंदवल्लीहून जुन्नरास आणिले होते ते माघमासीं परशुराम रामचंद्र यांनीं जाऊन उभयतांस पुण्यास आणिलें. वैशाख मासीं वद्य पंचमीस आप्पास वस्त्रें झालीं. शिंदे होळकर पुण्यांत.

१ सन सीततिसैन छ ८ जिलकाद. आप्पास वस्त्रें झालीं. बाजीराव थेवरास होते, ते पुण्यास शिंदे यांचे फौजेंत भाद्रपद मास पर्यंत होते. नंतर गंगेस स्वारी गेली.

१ सन सबा तिसैन[३७]. आश्वीनमासीं वद्य १२ द्वादशी परशराम रामचंद्र आप्पासाहेब यांस घेऊन जुन्नरास गेले; मागाहून हुजरातीच्या फौजा जाऊन पुण्यास आणिले, उपरांत बाजीराव यांच्या भेटी झाल्या.

१ बाजीराव रघुनाथ.

१ सन सब्बा तिसैन. गु॥ जुन्नराहून माघमासीं पुण्यास आणिले. उपरांत स्वारी बाहेर निघून थेऊरीचे मुक्कामीं होती. वैशाखमासीं शिंदे यांच्या फौजेंत जाऊन पुण्यास आले. भाद्रपदमासीं हिंदुस्थानांत जावया करितां गंगे पर्यंत स्वारी गेली. नंतर पुण्यांत परशुराम रामचंद्र कारभार करित होते ते आप्पास

---

३४. ह्या लिहिण्यावरून सवाई माधवराव निवर्तल्यावर लागलीच ही हकीगत लिहिली गेली असें होतें.

३५. पुढील अक्षरें फाटत गेलीं आहेत तथापि पेशव्यांच्या बखरींत शेवटील परिच्छेदांत लिहिल्याप्रमाणेंच येथेंही लिहिलेलें असावें असें अनुमान होतें.

३६. सन १६ ( + मयां व अलफ= ११०० ).

३७. सन १७.

घेऊन पळाले ह्मणून स्वारी गंगेहून परतली. पुण्यानजीक येऊन आप्पासाहेब यांच्या भेटी झाल्या. मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस वस्त्रें झालीं. लग्न तिसरें झालें. बाळाजी जनार्दन महाडाहून आले. ते व श्रीमंत पुण्यास आले.

१ सन सम्मान तिसैर्न[38]. खासा * * * पट्टी केली. पौषमासीं शुद्ध त्रयोदशीस बाळाजी जनार्दन यास शिंदे यानीं अटक केली; दोन महिन्या नंतर नगरास पाठविले. फाल्गुन मासीं अमृतराव स्वारीस ह्मणून निघाले. मागें आप्पासाहेब याचें व दौलतराव यांचें लग्न झालें. सर्जेराव घाडगे यांची सोयरीक केली व उपरांत शिंदे याच्या बायकों[39] बाहेर काढिल्या. त्यांस नारायणराव बक्षी व पठाण मिळाले.

१ सन तिर्स्सां[40]. अमृतराव पुण्यांत आले. बाळाजी जनार्दन नगराहून शिंदे यांनीं आणिले. व आबाजी चिटणीस. शिंद्याच्या बायकांनीं फार उपद्रव केला. चैत्रमासीं वाड्यांत अमृतरायाच्या मुलाची मुंज झाली. शिंदे यांनीं बाळोबास नगराहून आणिलें आणि बायांच्या समजुतीस पाठविलें. परशराम रामचंद्र अव्वलीस मोकळे होऊन फौजे सुद्धां करनाटकांत गेले.

सनं मय्या तैनं[41]. खासा स्वारी व अमृतराव व आप्पासाहेब व बाळाजी जनार्दन सुद्धां पुण्यांत. भाऊ कर्नाटकांत. आबा, बाळोबा बायांच्या समजुतीस पाठविले, शिंदे यांणीं.

१ इंग्रजानीं टिप्पुसुलतान याचें स्थान बुडवून श्रीरंगपट्टण घेतलें. यशवंतराव, होळकर यांचे लेकवळे, यानें हिंदुस्थानांत फौज धरून शिंदे यांचीं ठाणीं उठविलीं. पठाण व कंपू यांनीं दक्षिणेंत लोकांस फार उपद्रव केला.

१ राजश्री बाळाजी जनार्दन यांचा काळ फाल्गुन वद्य ४ गुरुवार शके १७२१ सिद्धार्थीनाम संवत्सरे.

१ सन इहिदे आषर मय्यीं[42] * * * बाजीरावसाहेब यांस पुत्र वामनराव झाला आश्विन वद्य ५ बुधवारीं दीड घटका रात्रीस, शके १७३२ प्रमोदनाम संवत्सरे. जन्मनाम.

१ सन सब्बा आषर मय्या तैनातैं[43] श्रीमंत बाबासाहेब यांस पुत्र भाद्रपद वद्य ४ भोमवारीं एकोणतीस घटका रात्रीस. जन्मनाम. शके १७३८.

समाप्त.

---

३८. सन १८.

३९. महादजी शिंदे यांच्या कुटुंबाचें व दौलतरायाचें पडेना. तेव्हां बायांनीं बाहेर निघून दंगा आरंभिला. पे० ब० पृ० २१२ पहा..

४०. सन तिस्सां तिसैन=३९.

४१. मयातैन (व अल्फ)=१२००.

४२. स० इहिदे अशर मयातैन व अल्फ=१२११.

४३. सबां अशर मयातैन व अल्फ=१२१७.